शनिवार, १६ मार्च २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २०३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 16 MARCH 2024 | adhunikkesari.com | YEAR-03 • ISSUE-203 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

# आधी रोटी खाओ, प्रभू के गुण गाओ, और भूखे मर जाओ

## राहुल गांधी : नरेंद्र मोदींनी ओबीसी समाजासाठी काय केले?

आधुनिक केसरी न्यूज

**पालघर : देशातील ८८ टक्के लोकसंख्या असलेल्या दलित, मागास आदिवासी, ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व मीडिया, न्यायपालिका, प्रशासनासह सर्वच क्षेत्रात अत्यंत कमी आहे. नरेंद्र मोदी स्वतःला ओबीसी म्हणवतात पण ते ओबीसी नाहीत, ते जनरल कोट्यातले होते, गुजरात सरकारने कायदा बदलला त्यानंतर ते ओबीसी झाले. पण महत्वाचा प्रश्न आहे की, नरेंद्र मोदींनी ओबीसी समाजासाठी काय केले? जीएसटीच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांची लूट सुरु आहे आणि भाजपा सरकार मात्र तुम्हाला म्हणते, 'आधी रोटी खाओ, प्रभू के गुण गाओ, और भूके मर जावो' असा प्रहार काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केला.**



**भारत जोडो न्याय यात्रेची सुरुवात सकाळी :** मोखाड्यातील हनुमान मंदिरापासून झाली. जव्हार येथील विजय स्तंभाला राहुल गांधी यांनी अभिवादन केले. वाडा येथे सभेला संबोधित केले दुपारनंतर यात्रा खुडूस गावापासून पुन्हा सुरु होऊन ठाण्यात प्रवेश करेल व भिवंडीच्या आनंद दिघे चौकात जनसभा होईल. यात्रेचा आजचा मुक्काम सोनाळे मैदान येथे होणार आहे.

भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान पालघर जिल्ह्यातील वाडा येथे सभेला संबोधित करताना राहुल गांधी यांनी भाजपा सरकारवर तोफ डागली, ते पुढे म्हणाले की, हिंदुस्थानमध्ये ८८ टक्के लोकसंख्या ओबीसी, दलित, आदिवासी, मागास समाजाची आहे परंतु विविध क्षेत्रातील त्यांची भागिदारी अत्यंत कमी आहे. न्याय पालिकेतही वरच्या पदावर या समाज घटकातील लोकांची संख्या कमी आहे. ६ टक्के लोकांच्या हातात न्यायालय, मीडिया, पैसा, सत्ता आहे. जमीन अधिग्रहण करताना गरीब समाज घटकांची जमीन घेतली जाते पण अदानीची एक इंचही जमीन घेतली जात नाही.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही तर कंपन्यांना होत आहे. केंद्र सरकार १६ पिक विमा कंपन्यांना ३५ हजार कोटी रुपये देते हा जनतेचा पैसा आहे. ८८ टक्के लोकांच्या जीएसटीमधून हा पैसा दिला जातो. मात्र अवकाळी पाऊस, गारपीटीने नुकसान झाले तरी शेतकऱ्यांना मदत मिळत नाही. सरकारी कंपन्यामध्ये जनतेची भागिदारी होती पण आता सरकारची कामेसुद्धा खाजगी कंपन्यांकडूनच केली जातात त्यामुळे ८८ टक्के समाज घटकांचे प्रतिनिधित्व दिसत नाही. समाजाला मेहनत मजदुरीची कामे करावी लागतात पण ज्या दिवशी हा समाज जागा होईल त्यादिवशी देश हादरेल. काँग्रेस सरकार सत्तेत आल्यास दिवासींना जमीन पट्टे दिले जातील, जेथे ५० टक्के आदिवासी लोकसंख्या आहे तेथे ६ वे शेड्युल लागू केले जाईल म्हणजे स्थानिक सरकार, गावाच्या हातातच सर्व अधिकार असतील. प्रशासन व विविध क्षेत्रातील ही विषमता दूर करण्यासाठी जातनिहाय जनगणना करण्याची गरज आहे आणि काँग्रेसचे सरकार आल्यास जातनिहाय जनगणनाही केली जाईल, असे आश्वासन देत तुमच्या न्याय हक्कासाठी आवाज उठवायला शिका, जागे व्हा, असे आवाहन राहुल गांधी यांनी केले.

## ड्रोनला पाडण्याचे गरुडाला प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**हैदराबाद :** तेलंगणा पोलिसांनी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. तेलंगणा पोलिसांकडून गरुड पक्षाला शत्रूच्या ड्रोनला कसे रोखायचे? यासंदर्भात विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. याची यशस्वी चाचणीदेखील करण्यात आली असून यामध्ये गरुड पक्षाला विशेष प्रशिक्षण देण्यात आल्याप्रमाणे ते काम करण्यात यशस्वी ठरले आहेत. त्यामुळे या पुढच्या काळात धोकादायक ड्रोनच्या धोक्यांचा सामना करण्यासाठी प्रशिक्षित गरुड तैनात करण्याची योजना आहे. पोलिस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या गरुडांना दररोज एक तासाचे प्रशिक्षण दिले जात होते.

नेदरलँड, फ्रान्स या देशासह युरोपियन देशामध्ये अशा प्रकारचा उपाय योजिला जातो. आता युरोपियन देशाची प्रेरणा घेऊन गरुड पक्षाला शत्रूच्या ड्रोनला कसे रोखायचे? याबाबतचे प्रशिक्षण दिले गेले आहे. हे प्रशिक्षण जवळपास मागील तीन वर्षांपासून देण्यात येत होते. अखेर गरुड पक्षी यामध्ये यशस्वी झाले आहेत.

तेलंगणातील हैदराबादच्या मोइनाबाद येथील इंटीग्रेटेड इंटेलिजेंस प्रशिक्षण अकादमी (IITA) या ठिकाणी पोलिस महासंचालक रवी गुप्ता आणि वरिष्ठ 'आयपीएस' अधिकारी यांच्या उपस्थितीत एका प्रशिक्षित गरुड पक्षाने एका ड्रोनला खाली पाडले. गेल्या तीन वर्षांपासून या गरुड पक्षांना प्रशिक्षण देण्यात येत होते. प्रशिक्षणामध्ये हे गरुड पक्षी यशस्वी ठरले आहेत. अनेकदा राजकीय नेत्यांच्या व्हीव्हीआयपी भेटी, सार्वजनिक सभा आणि कार्यक्रमादरम्यान शत्रूच्या ड्रोनच्या धोका असतो. मात्र, यासाठी आता या प्रशिक्षित गरुड पक्षांचा वापर करण्याची तेलंगणा पोलिसांची योजना आहे. हे प्रशिक्षित गरुड पक्षी अशा 'व्हीव्हीआयपी' नेत्यांच्या भेटी, सार्वजनिक सभा आणि कार्यक्रमादरम्यान तैनात केले जाऊ शकतात. तेलंगणा पोलिसांकडून गरुड पक्षाला शत्रूच्या ड्रोनला कसे रोखायचे? यासंदर्भात विशेष प्रशिक्षण देण्यात आल्यामुळे या पुढील काळाच शत्रूच्या ड्रोनला लक्ष्य करण्यासाठी प्रशिक्षित गरुड तैनात असू शकतात. अशा प्रकारच्या कारवाईसाठी देशातील पोलीस दलातील ही पहिलीच घटना आहे.

**प्रात्यक्षिकाच्या व्हिडिओमध्ये काय दिसते?**
विशेष प्रशिक्षण देण्यात आलेल्या तीन गरुड पक्षांपैकी एक गरुड पक्षी एका शेडवर बसलेला व्हिडिओमध्ये दिसतो आहे. यानंतर एक ड्रोन अचानक आकाशात झेपावतो. यानंतर लागलीच हा प्रशिक्षित गरुड पक्षी त्या ड्रोनच्या दिशेने जाऊन त्याला पकडतो आणि खाली एका स्थळी घेऊन जातो. हे सर्व काम हा गरुड पक्षी अगदी अचूकपणे पूर्ण करतो. या तीन गरुडांपैकी दोन गरुडांचे वय दोन वर्षे तर दुसऱ्याचे वय दोन वर्षांपेक्षा थोडे जास्त असल्याचे सांगण्यात येत आहे. हे तीनही गरुड पाळत ठेवण्यात सक्षण असल्याचे सांगितले जात आहे.



## जनावरांच्या कानाला टॅगिंग करा; अन्यथा खरेदी विक्री बंद

आधुनिक केसरी न्यूज

**किशोर पाटणी**

**शिर्डी :** भारत पशुधन प्रणालीवर नोंद व कानावर शिक्के असल्याशिवाय १जुन २०२४ नंतर कुठल्याही जनावराची राज्यात खरेदी विक्री होणार नाही असा निर्णय शासनाच्या पशुसंवर्धन खात्याने घेतला आहे. ३१मार्च पर्यंत इअर टॅगिंग बंधनकारक करण्यात आले आहे जर नसेल तर उपचार देखील केले जाणार नाही. इअर टॅगिंग शिवाय कोणत्याही जनावराची वाहतूक केली तर वाहतूक करणारा व जनावरांचा मालक याच्यावर देखील नवीन आदेशानुसार कारवाई होणार आहे. कत्तलखाण्यासाठी जात असलेल्या जनावरावर देखील बंधन आली आहे. इअर टॅगिंग नसेल केले तर नैसर्गिक आपत्ती विजेचा धक्का वन्यपशुचा हल्ला यात जे जनावरे मृत्यूमुखी पडतील त्याना जर इअर टॅगिंग केले नसेल तर भरपाई देखील मिळणार नाही विक्री करिता वाहतूक करण्यात येणाऱ्या जनावराचे इअर टॅगिंग झाले आहे की नाही याची खातरजमा केल्यानंतर आरोग्य प्रमाणपत्र व वाहतूक परवानगी देली जाणार आहे.

## समृद्धीच्या टोलनाक्यावरील कामगार संपावर

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** सावळीविहीर लगत असलेल्या कोकमठाण शिवारात असलेल्या टोल नाक्यावर काम करणारे कर्मचारी आपल्या विविध मागण्यासाठी संपावर गेले असून काही वाहने टोल न भरता जात असल्याचे चित्र दिसत आहे.

हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावरील शिर्डी इंटरचेंज वरील कामगार संपावर गेले आहेत थकीत वेतन वेतन स्लिप न दिल्याने हे कर्मचारी संपावर गेले आहे त्याला जवळपास आज सहा दिवस झाले आहे आमच्या मागण्या जोपर्यंत मागण्या मान्यज्ञहोत नाही तो पर्यंत कामावर हजर होणार नाही असा या कामगाराचा पवित्रा घेतला आहे. या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली असता मोठ्या प्रमाणावर शांतता होती तसेच काही वाहने तोडलं भरताच जाये करत होती अशा वाहनांना दंड होणारा असून त्याची जबाबदारी कोणाची असा प्रश्न काही वाहनधारकांनीच व्यक्त केला आहे.



# ज्येष्ठ पत्रकारांना आता मिळणार दरमहा वीस हजार रुपये


## वयोवृद्ध पत्रकारांची हेळसांड थांबवण्यासाठी निर्णय : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांच्या सन्मान निधीत अकरा हजारावरून वीस हजार रुपये अशी भरीव वाढ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यासंदर्भात अनेक पत्रकार आणि पत्रकार संघटनांनी केलेल्या मागणीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा निर्णय घेतला. वयोवृद्ध पत्रकारांची हेळसांड थांबविण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

यासंदर्भात गेल्या वर्षीच्या अधिवेशनात विधानपरिषदेत राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी देखील यासंदर्भात चर्चा उपस्थित केली होती त्याचप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात अर्थसहाय वाढविण्याची घोषणा केली होती. ज्येष्ठ पत्रकारांप्रती आदरभाव, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि वृध्दावस्थेत त्यांची हेळसांड होऊ नये म्हणून "आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेत अधिस्वीकृतीधारक पात्र ज्येष्ठ पत्रकारांना सध्या ११ हजार रुपये सन्मान निधी दर महिन्याला मिळतो. आता नऊ हजार रुपयांनी ही रक्कम वाढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याने राज्यातील वयोवृद्ध पत्रकारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत ही योजना राबविण्यात येत असून निकष व कार्यपध्दतीनुसार प्रत्यक्ष पात्र अधिस्वीकृतीधारक ज्येष्ठ पत्रकारांनाच या योजनेचा लाभ देण्यात येईल. ही मासिक अर्थसहाय्याची रक्कम "शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी" मधील ५० कोटी इतक्या मुदत ठेवीच्या रकमेवरील व्याजाच्या रकमेतूनच देण्यात येईल. ही रक्कम डीबीटीने संबंधित पत्रकारांच्या खात्यात जमा होईल. गेल्या वर्षी मार्चमध्येच हा निधी ३५ कोटींवरून वाढवून ५० कोटी करण्यात आला आहे. राज्यात अनेक वयोवृद्ध पत्रकार हलाखीच्या परिस्थितीत जगत आहेत. त्यांना वैद्यकीय उपचारासाठी देखील आर्थिक मदत नसते. या वाढीव निधीमुळे त्यांना चांगले अर्थसहाय मिळेल.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# सावधान ! शांतता कोर्टात गेली आहे..!



आधुनिक केसरी

जेवणानंतर पुन्हा डीजे सुरु झाला. रात्री वाजेपर्यंत डीजेच्या आवाजात सगळ्यांचे नाचणे झाले. सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर मंडप, डीजे. आजूबाजूच्या कोणाला त्रास होत असेल याचा कोणताही विचार नाही. त्याऐवजी असे कार्यक्रम इतरांना त्रास होणार नाही अशा पद्धतीने आयोजित करता येणार नाहीत का ? पण आमचे सामाजिक भान सुटत चालले आहे. ' इतरांचा काय संबंध ? माझ्याकडे कार्यक्रम आहे ? कोणाला त्रास होत असेल तर मला काय त्याचे ? इतरांकडे कार्यक्रम असतो, तेव्हा ते करतात का असला विचार ? ' प्रत्येकजण असा सोयीस्कर स्वतःपुरता विचार करताना दिसतो. पूर्वी फक्त दिवाळीतच फटाके फोडत असत. हल्ली प्रसंग कोणताही असो, फटाके फोडायचे हे ठरलेले असते. लग्न, मिरवणूक, वाढदिवस, पार्टी, क्रिकेटची मॅच, एखादा विजय किंवा यश साजरे करणे हे फटाके आणि डीजे लावल्याशिवाय होताना दिसत नाही. त्यातूनही बरेचसे बहाद्दर रात्री बारानंतर फटाके फोडून लोकांना त्रास देण्यात आनंद मानणारे आहेत. फक्त कोणी गेल्यानंतर अजून फटाके वाजवण्याची पद्धत सुरु झाली हे नशीब ! एक गमतीदार प्रसंग सांगतो. काही दिवसांपूर्वी एका सुप्रसिद्ध अशा धार्मिक स्थळी गेलो होतो. तिथे दर्शनासाठी निरनिराळ्या राज्यातून लोक आले होते. मंदिरात दर्शनाला जाताना रस्त्यातून एक मिरवणूक जात होती. कोणीतरी एक जवान सैन्यातून निवृत्त झालेला होता. त्याच्या स्वागताचे आणि अभिनंदनाचे पोस्टर्सही सगळीकडे लावले होते. एका उघड्या जीपमधून त्यांची मिरवणूक सुरु होती. त्या गाडीच्या पुढे कर्कश आवाजात डीजे लावलेला होता. त्यापुढे त्या मिरवणुकीत सामील झालेले बरेचसे स्त्रीपुरुष बेभान होऊन नाचत होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे जो जवान सैन्यातून निवृत्त झाला होता, तो आणि त्याची पत्नी त्या जीपवर त्या गाण्यांच्या तालावर वेडेवाकडे नाचत होते.



## आनंदी पहाट

# योग आणि ध्यानाचे शारीरिक फायदे

आधुनिक केसरी

योग आणि ध्यानाचे शारीरिक पैलू नियंत्रित श्वासोच्छवासासह एकत्र केले जाऊ शकतात. लक्ष केंद्रित करण्यासाठी डोळे मिटून हे करणे, हे खूप शक्तिशाली साधन असू शकते. याव्यतिरिक्त, योग आणि योग ध्यानाचे उपचारात्मक फायदे उच्चरक्तदाब, झोपेची समस्या आणि चिंता यासारख्या काही शारीरिक समस्यांची तीव्रता कमी करण्यात मदत करू शकतात, सर्व काही मजबूत रोगप्रतिकार प्रणाली तयार करताना. हे सर्व चांगले आहे. योग आणि ध्यान या दोन्ही पद्धतींचा उगम उत्तर भारतात झाला; आपल्याला हे माहित आहे कारण योग आणि ध्यान या दोन्ही गोष्टींचा उल्लेख ऋग्वेद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काही जुन्या ग्रंथांमध्ये आहे. असा अंदाज आहे की आज जगभरातील 500 दशलक्षाहून अधिक लोक योग आणि ध्यानाचा शारीरिक सराव नियमितपणे करतात. असे बरेच लोक आहेत ज्यांना समूह ध्यानाचे फायदे आहेत. कदाचित त्यांना काहीतरी माहित असेल जे आम्हाला नाही. योग ध्यानाचे शारीरिक फायदे दुसऱ्या दिवशी जेव्हा तुम्ही अंथरुणातून उठता तेव्हा दिसायला हवे. तुम्हाला देखील स्नायू दुखावल्याचा आनंद अनुभवता येईल, खासकरून जर तुम्ही काही वेळात व्यायाम केला नसेल! ध्यानासोबत योग हा सरावाचा एक लोकप्रिय प्रकार आहे. योगाभ्यासामुळे शारीरिक ताण आणि शरीरातील उत्तेजना कमी होण्यास मदत होते. उदाहरणार्थ, नियमित योगाभ्यासासह ध्यान केल्याने रक्तदाब आणि हृदय गती कमी होऊ शकते, शरीरातील जळजळ कमी होते आणि तीव्र वेदना कमी होण्यास मदत होते. योगादरम्यान शरीरात निर्माण होणाऱ्या रसायनांव्यतिरिक्त, नियमित योगाभ्यासातील शारीरिक घटक देखील विद्यार्थ्याला वेदना, सांधे कडक होणे आणि स्नायूंच्या तणावातून काम करण्यास मदत करू शकतात जे अर्थातच व्यायामानंतर आराम करण्यास मदत करू शकतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## जगण्याची वारी | धन्य झाली ||


करता भक्तीने | वारी पंढरीची ||
आम्हा आनंदाची | काय वाण ||१||
टाळ मृदुंगाचा | काळजात नाद ||
ऐकू येता साद | सुखावलो ||२||
खेळण्या पाऊली | आतुरला जीव ||
अंतरीची धाव | व्याकुळली ||३||
संसाराचा मोह | संसारी निमाला ||
मौनात रमला | आत्माराम ||४||
अभंगाच्या संगे | वाजे एकतारी ||
जगण्याची वारी | धन्य झाली ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज





**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## सद्गुरू मोरेदादा

अखिल भारतीय दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवामार्गाचे संस्थापक, प्रवर्तक सद्गुरू मोरेदादांनी बालसंस्कारांविषयक खूप तळमळ वेळोवेळी व्यक्त केली. त्यांच्या परखड विचारांतून बालसंस्काराची ध्येये स्पष्ट झालीत . या देशात वृद्धाश्रम उभे राहू नयेत. त्यासाठी देणग्या देण्यापेक्षा बालसंस्कारासाठी वेळ द्या, अधिकाधिक चांगले कौटुंबिक व सामाजिक वातावरण निर्माण करण्यास तन-मन-धन खर्ची घाला,अनाथ बालकांचे आई-बाप होऊन त्यांच्यातला माणूस सबळ, शक्तीमान बनवा, मुलांमधल्या सर्व चांगल्या गुणांचा, क्षमतांचा, भावनांचा विकास करून त्यांना कार्यप्रवृत्त होण्यासाठी मार्गदर्शन करा असे दादासाहेब आग्रहाने मांडत असत. पालकांनी आपल्या मुलांवर जास्तीत जास्त लक्ष द्यावे, त्यांच्याशी सुसंवाद वाढवावा, त्यांच्या व्यक्तीमत्त्व विकासात सहभाग घ्यावा, त्यांना उत्कृष्ट ध्येये व आदर्श द्यावेत, त्यांच्या विचारांचे शिल्पकार व्हावे, माणूस म्हणून त्यांच्या जाणिवा व बुद्धी विशाल करण्यासाठी परिश्रम घ्यावे, असे दादासाहेब वेगवेगळ्या आदर्श उदाहरणांतून, थोर पुरुषांच्या चरित्रांतून जनतेला समजावून सांगत असत. संस्कारांची सुरवात घरातून होते म्हणून कौटुंबिक जीवन समाधानाचे, निरामय व सुसंस्कारांचे व्हावे, यासाठी प्रश्नोत्तर सेवेच्या माध्यमातून मोरे दादासाहेबांनी घरा-घरांत चैतन्य जागवले. माणसाला स्वतःच्या हृदयात व बाहेर ईश्वर अनुभवायला शिकवले. प्रत्येक उंबरठ्याच्या आत मोरेदादांनी भक्ती व अध्यात्म नेऊन संस्कृती पुन्हा आचार-विचारात रुजवली. यासाठी अट्टाहास घेऊन, कठीण अशा विरोधांचा सामना करून दादांनी शाश्वत ज्ञानाचा झरा जनसामान्यांच्या जीवनात प्रवाहीत केला. बालसंस्काराचे कार्य अशा सुगंधित मातीतून उमलते आहे.


संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

परा व मूलाधार में, हृदय में पश्यन्ति ।
कण्ठ में वही मध्यमा, मूख वैखरी अन्ति ।।०१ ।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल तृतीय अध्याय) ०२/०३/०१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :

परा, पश्यंति, मध्यमा आणि वैखरी हे वाणीचे चार स्वरूप आहेत. वाणीचं एक मूळ स्थान आहे, जिथून ती प्रगट होते. तेच सर्व वाणींचा आधार आहे. परा वाणी याच मूलाधारातून प्रगट होऊन आत्म्यात येते तेव्हा तिला पश्यंति म्हणतात. तीच परत कंठात येऊन मनाच्या संयोगाने बाहेर येऊ लागते , तेव्हा तिला मध्यमा म्हणतात आणि त्यानंतर मुखाद्वारे दंत-ओठाच्या संबंधाने जेव्हा बाहेर प्रगट होते तेव्हा तिला वैखरी म्हणतात. हेच वाणीचे चार स्वरूप आहेत. मूलाधारातून हृदय , नंतर कंठ आणि त्यानंतर मुखातून शब्द बाहेर प्रगट होतात. हाच वाणी बाहेर प्रगट होण्याचा क्रम आहे.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

# नाम हे सत्स्वरूप आहे

आधुनिक केसरी

नाम हे रूपापेक्षा निश्चित श्रेष्ठ आहे; त्यामुळे रूपाचे ध्यान मनामध्ये आले नाही तरी नाम सोडू नये. पुढे रूप आपोआप येऊ लागेल. रूप हे जड आणि दृश्य असल्यामुळे उत्पत्ती, स्थिती आणि विनाश, वाढ होणे आणि घटणे, जागा व्यापणे आणि जागा बदलणे, कालमानाने फरक पडणे इत्यादि बंधने त्याला असतात; पण नाम हे दृश्याच्या पलीकडे आणि सूक्ष्म असल्यामुळे त्याला उत्पत्ती आणि विनाश, वाढ आणि घट, देशकालनिमित्ताच्या मर्यादा, इत्यादि कोणतेही विकार नाहीत. नाम हे सत्स्वरूप आहे. नाम हे रूपापेक्षा व्यापक असते. व्यापक वस्तूचे क्षेत्र मोठे असल्याने तिच्यामध्ये शक्तीदेखील अधिक असते. जिच्यामध्ये शक्ती जास्त असते ती वस्तू अधिक स्वतंत्र असते. जी वस्तू अधिक स्वतंत्र असते तिला बंधने किंवा मर्यादा कमी असतात. म्हणून नाम हे रूपापेक्षा अधिक व्यापक, अधिक शक्तिमान, अधिक स्वतंत्र आणि अधिक बंधनरहित असते. आपली ज्ञानक्रिया कशी चालते ते पाहू. आपण एका टेकडीवर उभे राहून सृष्टिसौंदर्य पाहिले. त्या



पाहण्यात कोणकोणत्या क्रिया होतात पाहा. प्रथम डोळ्यांमधून प्रकाश-किरणे आत गेली. बाह्य पदार्थांचे मनुष्याला ज्ञान व्हायला इंद्रिये हे पहिले साधन आहे. इंद्रियांमधून आत आलेले संस्कार एकत्र करून मन त्यांना वस्तूस्वरूप देते. वस्तूस्वरूप तयार झाल्यावर, बुद्धी सारासार विचार करून त्या वस्तूचे यथार्थ ज्ञान आपल्याला करून देते. पण मनुष्याच्या बुद्धीचा व्यापार इथेच थांबत नाही. टेकडीवरून आजूबाजूला पाहात असताना झाडे, वेली, घरे, बागा, माणसे, पक्षी, पाण्याचे तलाव इ. सर्व वस्तूंचे ज्ञान झाल्यावर पुन्हा त्यांचे एकीकरण होऊन, 'ही सृष्टीची शोभा आहे' असे ज्ञान आपल्याला होते. म्हणजे अनेकांत एकत्व शोधणे हेच मानवी ज्ञानाचे लक्षण आहे. या जगामध्ये कितीतरी वैचित्र्य आढळते. नाना तऱ्हेचे दगड, नाना तऱ्हेचे किडे, नाना प्रकारचे पक्षी, प्राणी या सर्वांची नावे जरी भिन्न असली तरी त्या सर्वांमध्ये 'असणेपणाचा' गुण आहे; म्हणजे, सजीव प्राणी झाला तरी तो 'आहे', आणि निर्जीव वस्तू झाली तरी तीही 'आहे'. एवढेच काय, पण आनंदालासुद्धा 'आहेपणा'चा गुण आहे. या 'असणेपणा'च्या गुणाला 'नाम' असे म्हणतात. यालाच 'ॐकार' असे म्हणतात. 'ॐकारांतून सर्व सृष्टी उगम पावली. ॐकार हे परमात्म्याचेच स्वरूप आहे. अर्थात्, नाम म्हणजे सत् होय. म्हणूनच नाम हे सृष्टीच्या आरंभी होते, ते सध्या आहेच, आणि सृष्टीचा लय झाला तरी ते शिल्लक राहणारच. नाम म्हणजे ईश्वर होय. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात आणि अखेर त्यामध्येच ती लीन होतात. रूप हे नामाहून निराळे राहू शकत नाही. नाम हे रूपाला व्यापून पुन्हा शिल्लक उरते.

**४३. नाम हे शाश्वत आहे. ते पूर्वी टिकले, आता आहे, आणि आपण गेल्यावर ते राहणार आहे.**

## ब्रम्हनिरूपण



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

आता हे चं बघानां शब्द व अर्थ यांचा संबंध ते धान्या भुसा (भुसकट)अशा स्वरूपात आपल्याला सांगतात. शब्द हे स्थुल आहेत तर अर्थ सुक्ष्म असतो. आपल्याला शब्दाचा अर्थ हवा असेल तर शब्दाचा वापर करतो.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, १६ मार्च २०२४
adhunikkesari.com

# जुगार अड्ड्यावर धाड; १ लाख ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त

## लोह्यात पोलिसांची कारवाई : सात आरोपींविरुद्ध गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरा लगत हळदव शिवारात झाडाखाली बेकायदेशीर रित्या बावन पत्यांचा खेळ पैशावर खेळत असताना लोहा पोलिसांनी धाड टाकून रोख रक्कमेसह १ लाख ३३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून सात आरोपींविरुद्ध लोहा पोलिसात गुन्हा दाखल केला. तालुक्यातील हळदव वरून सुनेगाव तलावाकडे जाणाऱ्या पांदण रस्त्यालगत एका लिंबाच्या झाडाखाली सात जण हे अनधिकृत व बेकायदेशीर रित्या बावन पत्याचा हार जितचा खेळ पैशावर खेळत असल्याची माहिती लोहा पोलिसांना गुप्त खबऱ्या मार्फत मिळाली त्यावरून लोहा पोलिसांनी दि. १४ रोजी गुरुवारी दुपारी सापळा रचून धाड टाकली असता तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले तर चार आरोपी पसार झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून बावन पत्याचे ११ कॅट, बसण्याच्या दोन चटई, रोख रक्कम आणि दोन मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. पोलिस उपनिरीक्षक विश्वदीप रोडे यांच्या तक्रारीवरून लोहा पोलिसात महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे सात आरोपी विरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदरील कार्यवाही पो. नि. ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि विश्वदिप रोडे यांच्या नेतृत्वात लाडेकर, माधव डफडे, राठोड, दीपक गुट्टे, कैलास गिरे आदी पोलिस कर्मचारी सहभागी होते. यापूर्वी दि. १३ रोजी बुधवारी देखील लोहा शहरातील वखार महामंडळाच्या नजीक अनधिकृत पत्याच्या डावावर धाड टाकून २९ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून दोन आरोपी विरुद्ध पोलिसात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



# धुळे तहसील कार्यालयात जागतिक ग्राहक दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शासन स्तरावरून ग्राहकांची जनजागृती करण्याच्या वेगवेगळ्या संस्थांच्या माध्यमातून ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे काम निरंतरपणे केले जाते. पण ग्राहकांनी देखील आपल्या अधिकार आणि हक्काच्या बाबतीत जागरूक राहिले पाहिजे, असे आवाहन तहसीलदार अरुण शेवाळे यांनी आज केले.
धुळे तालुका तहसील कार्यालयाच्या वतीने आज जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार अरुण शेवाळे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून असोसिएशन बिजनेस अँड कॉमर्स धुळे (ए बी सी डी) चे पदाधिकारी सुभाष कोटेचा, नायब तहसीलदार अश्विनी मराठे तसेच धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष यशवंत हरणे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक पुरवठा निरीक्षण अधिकारी मायानंद भामरे यांनी केले. यावेळी बोलताना तहसीलदार अरुण शेवाळे यांनी ग्राहकांनी आपल्या अधिकार आणि हक्काच्या बाबतीत नेहमीच जागरूक राहिले पाहिजे, असे आवाहन केले. विशेषता शेतकरी आणि व्यापारी यांनी विशेष काळजी घेण्याची गरज आहे. व्यापारी देखील हा ग्राहक असतो. त्यामुळे सर्वांनी आपले हक्क आणि जाणीव जागरूकता ठेवावी ,असे आवाहन त्यांनी केले. यानंतर बोलताना सुभाष कोटेचा यांनी रेशन दुकानदारांच्या अधिकारासंदर्भात मार्गदर्शन केले. या देशात व्यापारी हे अर्थव्यवस्थेचा कणा आहे. व्यापाऱ्यांच्या माध्यमातून जीएसटी ,विक्रीकर असे अनेक कर शासनाच्या तिजोरीत जमा होतात. भारतीय अर्थव्यवस्थेत व्यापाऱ्यांचे फार मोठे योगदान आहे. त्याचप्रमाणे रेशन दुकानदार हा देखील व्यापाऱ्यांप्रमाणेच महत्त्वाचा घटक आहे. शासनाच्या वेगवेगळ्या अन्नधान्य संदर्भातील योजना या जनतेतील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे काम रेशन दुकानदार करतात. त्यांच्या समोर अनेक समस्या असून देखील ते शासनाचा कणा म्हणून काम करतात. त्यांच्या या समस्या सोडवल्या गेल्या पाहिजे ,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली .यावेळी बोलताना यशवंत हरणे यांनी सांगितले की, सध्या ऑनलाईन पद्धतीने वेगवेगळ्या वस्तूंचे मार्केटिंग सुरू आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस वक्ता प्रशिक्षण विभाग राज्यप्रमुखपदी शेळके

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वक्ता प्रशिक्षण विभागाच्या राज्यप्रमुखपदी सुशील शेळके यांची नियुक्ती करण्यात आल्याचे पत्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले.पक्षाच्या वाढीसाठी व पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्यापर्यंत पोहोचवण्यासाठी पक्षाला सहकार्य राहील अशा आशयाचा मजकूर या पत्रात असून त्यांच्या निवडीबद्दल प्रदेशाध्यक्ष श्री सुनिल तटकरे यांनी अभिनंदन देखील केले आहे. कार्यालयीन सरचिटणीस शिवाजीराव गर्जे यांच्या हस्ते व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष व माजी आमदार दिपक साळुंखे,राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस अमर पाटील, सोशल मिडियाचे प्रमुख पराग पाटील यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात आले.




सुशील शेळके हे गेल्या सहा वर्षापासून वक्ता प्रशिक्षण विभागाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहत होते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीवेळी देखील त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम अत्यंत उत्तम केले होते त्यासोबतच आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या काळातही ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खंदे व नवोपक्रमशील कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या या नियुक्तीबद्दल फोन वरुन उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार,शिक्षक आमदार विक्रम काळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, प्रदेश सरचिटणीस सुरेश पाटील,प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे,कार्याध्यक्ष नवनाथ जगताप,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष मनोज जगताप,कळंब शहराध्यक्ष दत्ता तनपुरे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कळंब शहराध्यक्ष विक्रम चोंदे,सोशल मिडियाचे प्रमुख सुहास मेटे, उदयचंद्र खंडागळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# उमेदवारीवरून सुरू झालेले नाराजीनाट्य चार दिवसांत संपेल : महाजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** राज्यात लोकसभेच्या २० जागांवर भाजपने उमेदवार जाहीर केल्यानंतर पक्षात नाराजीचे नाट्य उमटले असले तरी येत्या तीन-चार दिवसात सर्व ठिकाणची नाराजी दूर होईल. उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर पक्षातील वातावरण सुरळीत होईल. तसेच महायुतीमधील जागा वाटप यशस्वी होईल, असा दावा महाजन यांनी केला आहे. शुक्रवारी, आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापुरात आयोजित पक्षाच्या मेळाव्यासाठी महाजन आले होते. त्यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. लोकसभा निवडणुकांसाठी राज्यात भाजपने २० उमेदवारी जाहीर झाल्यानंतर उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या इतर अनेक नेत्यांच्या गोटात समाज माध्यमांतून पडसाद उमटत आहेत. माढा लोकसभेची उमेदवारी पुन्हा खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना मिळाल्यामुळे ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांचे पुतणे धैर्यशील मोहिते-पाटील यांचा संपूर्ण हिरमोड झाला असून त्यांचे समर्थक संतापले आहेत. कोणत्याही परिस्थितीत माघार न घेण्याचा निर्धारही बोलून दाखविला जात आहे. भाजपचे २० जागांवरील उमेदवार जाहीर झाल्यानंतर राज्यात अनेक ठिकाणी नाराजीचे सूर उमटले आहेत.

# मनमानी कारभार करणाऱ्या गोंडवाना विद्यापीठाच्या कुलगुरूंना परत बोलवा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 14 मार्च रोजी गोंडवाना विद्यापीठाच्या अधीसभेमध्ये विद्यापीठाचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पात बऱ्याच अनावश्यक तरतुदी केल्या गेल्या तसेच अनेक चुका असून महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अकाउंट कोड मधील तरतुदीनुसार सदर अर्थसंकल्प बनवल्या गेला नाही. अर्थसंकल्पामध्ये मागील वर्षी विद्यार्थी विकास विभागात 725.15 लक्ष रुपयांची तरतूद असताना केवळ 20. 72 लक्ष रुपये खर्च केले. हे सगळे पैसे विद्यार्थ्यांच्या हितासाठी, कल्याणासाठी असताना का वापरले गेले नाहीत? त्यामुळे यावर्षीच्या बजेटमध्ये तरतुदी करताना अर्थसंकल्प हा अवास्तव न ठेवता तो वास्तवाला धरून करावा. विद्यार्थी केंद्रित असावा. अशा सूचना सिनेट सदस्यांनी केल्या असता, सभेच्या अध्यक्षस्थानी असलेल्या कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी अधिसभा सदस्यांना सांगितले की, या अर्थसंकल्पात कोणताही बदल केला जाणार नाही. हा अर्थसंकल्प आम्ही सादर केला तो जसाच्या तसा आपल्याला आजच मंजूर करावाच लागेल.* अशी हेकेखोर भूमिका घेतली. तसेच अधिसभेचे कामकाज ज्या महाराष्ट्र एकरूप परिनियम क्रमांक 4 नुसार चालते. मात्र त्यामधील विविध तरतुदींचा अर्थ स्वतःच्या मनाने लावून कुलगुरू दरवेळी नवीन नियम लावतात आणि सिनेट सदस्यांचे विद्यार्थी हिताचे प्रश्न कामकाजात काढून काढतात. या सर्व बाबींचा निषेध म्हणून प्रा. दिलीप चौधरी, अजय लोंढे, प्रा. निलेश बेलखेडे, डॉ. मिलिंद भगत, डॉ. सतीश कन्नाके, दीपक धोपटे. डॉ. प्रवीण जोगी, डॉ. विवेक शिंदे,डॉ. संजय साबळे, डॉ. एन. एस. वाढवे या10 सिनेट सदस्यांनी काल सभात्याग केला.
गोंडवाना विद्यापीठातील पदभरती संदर्भात दिनांक 20 नोव्हेंबर 2023 रोजी झालेल्या सिनेट मध्ये कुलगुरूंनी पदभरती मधील अनियमततेची चौकशी करण्यासाठी चार सदस्यीय चौकशी समिती जाहीर केली. मात्र या समितीची आजवर एकही बैठक घेतलेली नाही. विशेष म्हणजे पदभरती प्रक्रियेचे सदस्य सचिव असलेले अधिष्ठाता डॉ. अनिल



चिताडे यांनाच कुलगुरूंनी चौकशी समितीचे सदस्य सचिव केले आहे. त्यामुळे निष्पक्ष चौकशी कशी होईल?
मागील वर्षी झालेल्या दीक्षांत समारंभामध्ये खर्चासाठी एकूण 15 लक्ष रुपयाची तरतूद असताना प्रत्यक्षात 1 कोटी 9 लाख रुपये खर्च केला गेला. सिनेटच्या मान्यते शिवाय हा खर्च केला गेला याची चौकशी व्हावी म्हणून नेमलेल्या समितीला देखील सहा महिने झाले तरी केवळ एक बैठक झाली. विशेष म्हणजे या चौकशी समितीचे सदस्य सचिव हे अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे यांनाच नेमलेले आहे.
विद्यापीठाच्या सामान्य फंडातून वारे माफ खर्च केला जात आहे. चुकीच्या पद्धतीने खर्च केला जात आहे. श्री. साकेत दशपुत्र यांना वित्त व लेखा अधिकारी म्हणून ते अहर्ताधरक नसताना व त्यांना शासनाची मान्यता नसताना देखील दहा महिने वित्त व लेखाधिकारी म्हणून नियुक्त केल्या गेले. त्यांना वेतनापोटी अग्रीम रक्कम म्हणून जवळपास 11.70 लाख रुपये दिले गेले. नंतर त्यांना शासनाची मान्यता मिळाली नाही म्हणून त्यांनी राजीनामा दिला. विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार त्यांचे कडून राजीनामा दिल्यानंतर अग्रीम रक्कम वसूल करणे ही कुलगुरूंची जबाबदारी असताना, ती रक्कम वसूल न करता माफ केल्या गेली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार असे करता येत नाही. तरी देखील कुलगुरू व तत्कालीन व्यवस्थापन परिषद सदस्यांनी या खर्चाला कशी मान्यता दिली.?
सध्या विद्यापीठात 30 प्राध्यापकांची पदभरती करण्यात आली. त्यांना अजूनही शासनाने मान्यता दिलेली नाही. तसेच पदभरती प्रक्रियेशी चौकशी सुरू असल्यामुळे त्यांचे वेतन सुरू झाले नाही. त्यामुळे या प्रत्येक प्राध्यापकाला 25 हजार रुपये दरमहा अग्रीम वेतन देण्याचा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मान्य केला आहे. जर उद्या त्यांचीही वेतन निश्चिती झाली नाही. तर हे कोट्यावधी रुपये कुलगुरू खरंच वसूल करतील काय? हा फार मोठा प्रश्न आहे.या पत्रकार परिषदेला सिनेट सदस्य प्रा. दिलीप चौधरी, प्रा. निलेश बेलखेडे प्रा. डॉ. सतीश कन्नाके प्रा. डॉ. एन एस वाढवे, डॉ. मिलिंद भगत, डॉ.प्रवीण जोगी, दीपक धोपटे हे उपस्थित होते.

## एसबीआयला नोटीस

आधुनिक केसरी

महिन्याभरापासून चर्चेत असणाऱ्या निवडणूक रोख्यांचा तपशील अखेर निवडणूक आयोगाने आपल्या संकेतस्थळावर जाहीर केला. या तपशीलामध्ये कुणी किती रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केले आणि कोणत्या राजकीय पक्षाला किती रुपयांचे निवडणूक रोखे मिळाले, याची माहिती जाहीर करण्यात आली आहे. पण कोणत्या व्यक्तीने किंवा कंपनीने कोणत्या राजकीय पक्षाला किती निधी दिला, याची माहिती मात्र समोर येऊ शकली नव्हती. आता यासंदर्भात महत्त्वाचा घटक असणारा निवडणूक रोख्यांचा विशेष क्रमांक जाहीर करण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने एसबीआयला नोटीस जारी केली. एसबीआयने दिलेली माहिती निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानंतर या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका करणाऱ्या असोसिएशन फॉर डेमॉक्रॅटिक रिफॉर्म्स संस्थेने सर्व निवडणूक रोख्यांचे विशेष क्रमांक जाहीर करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेची दखल घेत न्यायालयाने यासंदर्भात एसबीआयला विशेष क्रमांक जाहीर करण्यासंदर्भात नोटीस बजावली आहे. त्यासोबतच निवडणूक आयोगाने निवडणूक रोख्यांसंदर्भातली सर्वोच्च न्यायालयाच्या ताब्यात दिलेली सीलबंद माहिती आयोगाला पुन्हा देण्याचीही न्यायालयाने यावेळी परवानगी दिली. एसबीआयकडून माहिती जाहीर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची विनंती न्यायालयात करण्यात आली तेव्हाच प्रत्येक निवडणूक रोख्याला देण्यात आलेल्या विशेष क्रमांकावरही युक्तिवाद झाला. कुणी कोणत्या पक्षाला किती निधी दिला, हे समजण्यासाठी हा विशेष क्रमांक महत्त्वाचा दुवा आहे. सध्या एसबीआयने जाहीर केलेली माहिती दोन प्रकारांमध्ये विभागलेली आहे. कुणी किती रकमेचे निवडणूक रोखे खरेदी केले आणि कोणत्या राजकीय पक्षाला किती रकमेचे निवडणूक रोखे मिळाले या प्रकारची वेगवेगळी माहिती सध्या एसबीआयनं जाहीर केली असून प्रत्येक निवडणूक रोख्यांना असणाऱ्या या विशेष क्रमांकाच्या मदतीने कुणी कोणत्या पक्षाला किती निधी दिला, हे स्पष्ट होऊ शकणार आहे! एडीआरकडून सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद करणारे वरीष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी दिलेल्या माहितीनुसार, याचिकाकर्ते लवकरच हा विशेष क्रमांक जाहीर करण्यासाठी एसबीआयला आदेश देण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयासमोर करणार आहेत. दरम्यान, या नोटीसला अद्याप एसबीआयकडून उत्तर देण्यात आलेलं नाही. दरम्यान, निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक रोखे तपशीलानुसार १ एप्रिल २०१९ ते १५ फेब्रुवारी २०२४ या काळात तब्बल २२ हजार २१७ कोटींचे निवडणूक रोखे राजकीय पक्षांच्या नावे जारी करण्यात आले आहेत. त्यापैकी ८ हजार ६३३ कोटींचे रोखे एकट्या भाजपाच्या नावावर आहेत, तर तृणमूल काँग्रेस दुसऱ्या आणि काँग्रेस तिसऱ्या स्थानावर आहे. भाजपाला मिळालेल्या रोख्यांपेकी आत्तापर्यंत भाजपाने ६ हजार ०६ कोटींचे रोखे वटवलेही आहेत. जानेवारी महिन्यातही भाजपाने २०० कोटींचे रोखे वटवले आहेत, अशी माहिती समोर आली होती.

## अंतराळ वीरांगणा: कल्पना चावला



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**अनेक मराठी माणसानी इतिहास घडविला पण प्रत्येकाचा इतिहास लिहिला गेला नाही. पण अशी एक व्यक्ती आहे की ज्यांचा इतिहास आवर्जून लिहावाच लागला. आज जवळजवळ सर्वच क्षेत्रांमध्ये महिला पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांद्या लावून कार्य करीत आहेत. ग्रामपंचायत सदस्या पासून ते राष्ट्रपती पदावर विराजमान झालेल्या आहेत. तसेच अवकाशात भरारी घेणाऱ्या आज पर्यंत जगातील 75 महिला आहेत. त्यातील कल्पना चावला ही एक दैदिप्यमान भारतीय वंशाची पहिली अंतराळवीर महिला आहे. त्यामुळे जगातील संपूर्ण मुलींना, महिलांना कल्पना चावला या प्रेरणास्रोत आहेत.**

त्यांना मिळालेली लोकप्रियता पाहून अमेरिकेतील 'नासा' या संशोधन संस्थेने त्यांच्या एका सुपर कॅम्पुटरचे नाव कल्पना चावला असे ठेवले आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा व संघर्षाचा इतिहास आपण या लेखात अभ्यासणार आहोत. त्यासाठीच हा लेखन प्रपंच... कल्पना चावला यांचा जन्म 17 मार्च 1962 रोजी हरियाणातील कर्नाल जिल्ह्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बनारसीलाल तर आईचे नाव संज्योती असे होते. त्यांना मोंटू नावाने घरात बोलले जात होते, बंधू संजय आणि बहीण दीपा अशी भावंडे होती , त्यांचा आवडता खेळ बॅडमिंटन, आणि न्यूयॉर्क शहर आवडायचे. कल्पना चावलाने शिक्षक किंवा डॉक्टर व्हावे, अशी आई -वडिलाची इच्छा होती. परंतु तिने जिद्दीने अवकाश भरारीच घेण्याची मनोकामना व्यक्त केली. म्हणून ती प्रत्येक भारतीयांच्या मनातील अंतराळ परी झाली. भारताच्या महान अंतराळवीर कन्या म्हणून त्या समोर आल्या त्यांनी चंडीगड येथून एरोनॉटीकल इंजिनिअरिंग पूर्ण केले. 1976 साली कर्नाल टागोर स्कूलमध्ये त्यांनी शालेय शिक्षण पूर्ण केले. पुढे विमान प्रशिक्षक जीन पिंयर हॅरिसन यांच्याशी तिचा 2डिसेंबर, 1983 रोजी विवाह झाला .1984 मध्ये अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठातून शिक्षण घेतले.

1988 मध्ये कोलोरॅडो विद्यापीठातून डॉक्टरेट पदवी तिने घेतली. 1995 मध्ये 'नासा'या अंतराळवीराच्या मोहिमेत सहभागी होत्या .1997 मध्ये त्यांची पहिल्या अंतराळ



उड्डाणासाठी निवड करण्यात आली. पहिल्या अवकाश प्रवासादरम्यान 372 तास त्या अंतराळात होत्या. 16 जानेवारी 2003 रोजी त्यांचा दुसरा अंतराळ प्रवास कोलंबिया यानातून सुरू झाला,1फेब्रुवारी 2003 मध्ये कोलंबिया अंतराळ यानाचा पृथ्वीशी संपर्क तुटला आणि टेक्सास वर क्रॅश झाले.त्यामुळे सात ही अंतराळवीरांचा दुर्दैवी अंत झाला. भारताने आपल्या पहिल्या हवामान उपग्रहाला कल्पना चावलाच्या स्मरणार्थ कल्पना -1 असे नाव दिले. तसेच भारत सरकारने 1982 मध्ये पद्मश्री, 1991 मध्ये पद्मविभूषण देऊन त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान केला तसेच भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने सुवर्णपदक स्पेस मेडल प्रदान केले. त्यांना अनेक मानाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले. आपण त्यांच्याकडून त्यांच्यात असलेली अवकाश भरारीची जिद्द, चिकाटी, शिकावी. बालपणी त्यांनी पाहिलेले स्वप्न वास्तववादी आणले हे लक्षात ठेवावे. प्रयत्नाला श्रमाची जोड झाली की आपोआप प्रकाशाच्या वाटा मिळत जातात. त्यासाठी श्रम हा विकासाचा पाया असतो. म्हणूनच जिद्दी माणसे सिद्धी मिळवतात हे सांगायला कोणत्या ज्योतिषाची आवश्यकता नाही. कल्पनेतून कल्पनेने साकारलेली मूर्ती म्हणजेच कल्पना चावला होय. निष्कलंक चारित्र्य, निस्वार्थी वृत्ती,साधी राहणी, कमालीची सहनशीलता, पारदर्शी विचार व त्यातून आलेली निर्भयता, जनहिताचे निर्णय घेण्याची क्षमता, अभ्यासूवृत्ती हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती,

निरपेक्ष बुद्धीने विधायक काम करण्याचे आस आणि परिवर्तनशील उपक्रम यशस्वीपणे त्यांनी राबविले.

हे सत्य काल, आजही आणि उद्याही सत्य राहील, असे मला वाटते. मरावे परी कीर्ती रुपी उरावे हे सुभाषित त्यांना जशाच्या तसे लागू होते. तमाम भारतीयांना प्रेरणास्रोत म्हणून पहिले अंतराळ वीर पुरुष राकेश शर्मा आणि पहिल्या अंतराळवीर महिला कल्पना चावला यांनी उत्तुंग झेप घेतली आणि भल्याभल्यांची झोप उडवली त्यांचे कार्य भारतीयांना वर्षानुवर्ष स्मरणात राहील, त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना कोटी कोटी प्रणाम. ..

## निर्माण झालेलं अस्तित्व दाखवावं लागत नाही

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

ज्यांचं अस्तित्व निर्माण झालं त्याच्याकडं ते दाखविण्यासाठी वेळ नसतो किंबहुना ते दाखविण्यासाठी प्रयत्न देखील करावा लागत नाही पण ज्यांचं अस्तित्व नसतं तो मात्र अभास निर्माण करून दाखविण्यासाठी उतावीळ असतो.आपल अस्तित्व हे कोणाला दाखविण्यासाठी नसतं.आपली प्रचंड मेहनत,संघर्ष,रणनिती, प्रयत्नांची पराकाष्ठा, याच ते यज्ञ फल असतं जीवन हि अस्तित्व निर्माण करण्याची लढाई असते.हि लढाई जिंकली पाहिजे आणि लढाई जिकांयची असेल तर आपण आता नेमकं कुठं आहेत हे मान्य करावं लागतं.ते मान्य केल्या खेरीज योग्य मार्ग दिसत नाही.आपल्याकड करण्यासाठी उचित सार्थक काम नसेल तर मग आपल्या डोक्यात असल्या काही खुळचट कल्पना शिरतात कि आपण हवेतुन खाली जमीनीवर येतच नाहीत . त्या मुळे शेवटच्या क्षणापर्यंत आपली सत्यशी गाठभेट होत नाही.मग असत्यावर किती दिवस अंतर्मन समाधानी होईल. त्या अनुषंगाने मनातील असुरक्षितता द्वंद्व ,हे आपल्याला अस्वस्थ करत कारण भ्रम आणि सत्य या मध्ये अंतर असतं तसंच अंतर वास्तव आणि कल्पनेत देखील असतं.आणि आपण वास्तवाच्या जवळपास टप्प्यात पण नसतो.इथंच आपली गडबड होते.जीवन तर वास्तवावर अंवलबुन असत. आपण वास्तव निर्माण करण्या ऐवजी स्वतःला कल्पनेत कोणीतरी समजतो हाच जीवनाच्य नुकसानीचा पाया आहे. नसताना समजणं आणि ते दाखविण्यासाठी धडपडण या सगळ्या मध्ये जाणारा अमुल्य वेळ नुकसान कारक ठरतो. स्वतःला घडवण आवश्यक असतं दाखवणं नाही पण आपण स्वतःला घडावायच सोडुन दाखविण्यासाठी अतुर असतो. मुळात आपण कोण काय कसे याबाबतीत जगाला फार काही देणं घेणं नसतं.पण आपण मात्र जगाने आपल्याला कोणीतरी मोठा समजावं म्हणून आयुष्भर धडपडत असतो.ज्या क्षेत्रात आपला वावर आहे त्या क्षेत्रात सर्व श्रेष्ठ दर्जा आपण अर्जित केल्यावर अथवा त्या मार्गावर आपण असल्यावर आपण निरर्थक विषयांत बिलकुल गुंतुन राहत नाहीत अथवा स्वतःची मार्केटिंग करण्याच्या नादात वेळ वाया घालवत नाही. मुळात जो व्यक्ति अस्तित्वाने खरया अर्थाने मोठा आहे त्यांच्याकडं रिकामा वेळ अजिबात नसतो.रिकामे स्टेटस ठेवण लोकांनी आपल्याला कोणीतरी मोठा समजावं यासाठी वेगवेगळ्या पद्धतीचे प्रयत्न करणं हे सगळं कोणाला करावं लागतं तर ज्यांचं स्वतःच अस्तित्व निर्माण झाला नाही त्याला ज्याने आपल्या कष्टाने मेहनतीने स्वतःच साम्राज्य निर्माण केलं आहे त्यांच्याकडं इतका रिकामा वेळ कुठ आहे. कि आपल्याला अस्तित्वाचं मार्केटिंग करता येईल आणि ज्याने निर्माण केलं त्याला मार्केटिंग करण्याची गरज पण भासत नाही.

## ग्रामीण पत्रकारितेचे पाऊल आंतरराष्ट्रीय दर्जाकडे !



शांताराम मगर
संपर्क क्र.: 9422417540

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू असलेली पत्रकारिता आता वेगळ्या रंग-ढंगात मार्गक्रमन करत आहे. या दरम्यान पत्रकारितेत झालेला बदल कमालीचा असून ग्रामीण पत्रकारीतेचे पाऊल आंतरराष्ट्रीय दर्जाकडे पडत आहेत. लोकमत माध्यम समुहाचा अतिशय प्रतिष्ठीत आंतरराष्ट्रीय पातळीवरील "एक्सलन्स इन सोशल जर्नलिझम अवार्ड' महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना दुबईत प्रदान करण्यात आला. तर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई प्रदेश सरचिटणीस विश्र्वासराव आरोटे यांना डॉक्टरेट पदवी प्रधान करण्यात आली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई यांच्या विविध विषयांवर झालेल्या कार्यशाळेच्या आधिवेशनाच्या माध्यमातून शहरी पत्रकारितेसह ग्रामीण पत्रकारिता आता आंतरराष्ट्रीय दर्जाची होत आहे.**

डिजिटल, अत्याधुनिक साहित्य व योग्य व्यासपीठ मिळत असल्याने गाव, तालुका, जिल्हा, राज्य किंबहुना देश पार करून ग्रामीण पत्रकारिता परदेशात आपला डंका वाजवत आहे, याला अत्याधुनिक सोशल मीडियाचा भक्कम आधार ही मोठी उपलब्धी आहे. महाराष्ट्राला ध्येयवादी,निर्भीड पत्रकारितेची गौरवशाली परंपरा आहे, ही परंपरा पुढे घेऊन जात, शब्दांना सत्याची धारदेत राज्यातील मराठी वृत्तपत्रसृष्टीत स्वतंत्र स्थान निर्माण करत पत्रकारिता बहरत राहीली आहे, यातील लेखनातूनजिल्ह्याच्या, राज्याच्या राजकीय, सामाजिक चळवळीला,समाजाच्या सर्वसमावेशक विकासालानक्कीचनवी दिशामिळत गेली आहे. मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्यापासून सुरू झालेली मराठी पत्रकारिता ही नेहमीच ध्येयवादी राहिली आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात देशाची पारतंत्र्यातून मुक्ती हे मुख्य ध्येय होते. नंतरच्या काळात लोकप्रबोधन, अनिष्ठ रूढी-परंपरांचे उच्चाटन, समाजाच्या सर्वांगीण विकासाला गती, यासारखी अनेकाविध उद्दिष्टये नजरेसमोर ठेवून मराठी पत्रकारिता पुढे जात राहिली. मराठी पत्रकारितेत आपले स्थान निर्माण करत असताना, राज्यातील प्रत्येक वृत्तपत्राने आपली वैचारिक बांधिलकी जपण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला. ही वैचारिक बांधिलकी त्या त्या वृत्तपत्राची ओळख बनली, काळानुसार पत्रकारिता हायटेक होत राहिली अन डिजिटल तंत्रज्ञानाचा साहाय्याने गावकुसातील अपडेट तात्काळ दर्शकापर्यत पोहचायला लागली. केवळ वृत्तपत्र नाही तर न्यूज चॅनल, यु ट्यूब चॅनल, वेब न्यूज,न्यूज पोर्टल, या माध्यमातून अपडेटची दर्शक- वाचकांना सवय लागली , तात्काळ अपडेट देणाऱ्या पत्रकारितेमुळे दर्शकांची भूक भागू लागली. ग्रामीण भागातील पत्रकारिता पहिले केवळ एका चौकटीत बंदिस्त होती, गाव व खेड्यातील प्रश्न , समस्या ह्या छापून यायच्या व त्याला देखील "ग्रामीण" मध्येच स्थान असायचे. कित्येक वृत्तपत्रांनी शहर वेगळे व ग्रामीण वेगळे असे प्रयोग देखील केलेले आहे, आता मात्र ह्या ग्रामीण पत्रकारितेने कात टाकली असून , परदेशात बघितल्या जाणाऱ्या बातम्या आता ग्रामीण भागातून येत असल्याचा सार्थ अभिमान वाटतो. भारत हा कृषीप्रधान देश असल्याचा गवगवा होतो मात्र या देशातील बळीराजा जे नवीन शोध, प्रयोग, व उपक्रम राबवतो हे या आधी म्हणावे तसे दाखवले गेले नाही, आता मात्र डिजिटल युगात माझा बळीराजा काय करतोय हे परदेशात देखील अगदी सचित्र बघता येते. ग्रामीण भागात असलेल्या हरहुन्नरी कलाकारांना आता स्थान मिळू लागले आहे, कला, क्रीडा, साहित्य, नवनवीन शोध आदी गोष्टीला मोठे महत्व प्राप्त झाले आहे. पहिले केवळ शहरी पत्रकारिता लक्ष असलेल्या प्रस्थापित माध्यमांनी देखील आता ग्रामीण भागातील घडणाऱ्या प्रत्येक बातमीवर करडी नजर ठेवायला सुरुवात केली अन त्यांना देखील टीआरपी मिळू लागला. अलीकडच्या काळात पत्रकारितेचे शिक्षण देणारे केंद्र सुरू झाल्याने पत्रकारिता आधिकच गतिमान झाली, यात शोध पत्रकारिता व नाविन्यपूर्ण वार्ता संकलन सुरू झाल्याने काही वेळातच मिलियन मध्ये विव्हर्स मिळायला लागले. ग्रामीण मधील अगदी छोट्या, साध्या घटना घडामोडीचा सर्व कंगोऱ्याचा अभ्यास आता होऊ लागला आहे. एकंदरीतच ग्रामीण पत्रकारिता आता व्यापक स्वरूप प्राप्त करत आहे.

*पुण्यात आज महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्यस्तरीय अधिवेशन*


हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# चंद्रपुरात भाजपाचे ठरले, काँग्रेसचे काय ?

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता आता अवघ्या काही तासात घोषित होईल. निवडणूक आयोगाची रीतसर पत्रकार परिषद होऊन त्यात निवडणुकांच्या तारखा घोषित होतील. पण त्यापूर्वीच भारतीय जनता पार्टीने दुसरी यादी जाहीर करून निवडणुकीच्या एकूणच रणधुमाळीत अग्रेसर असल्याची भूमिका दाखवून दिलेली आहे. चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निर्वाचन क्षेत्रामध्ये भाजपाने महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री असलेल्या सुधीर मुनगंटीवार यांच्या गळ्यात लोकसभेच्या उमेदवारीची माळ घातलेली आहे. परंतु काँग्रेसमध्ये मात्र अजूनही अंतर्गत कलहामुळे या ठिकाणचा उमेदवार जाहीर झालेला नाही.

2019 च्या निवडणुकीमध्ये काँग्रेसच्या सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांनी ऐनवेळी शिवसेनेतून काँग्रेसमध्ये प्रवेश करत तत्कालीन केंद्रीय गृहराज्यमंत्री असलेल्या हंसराज अहिर यांचा पराभव केला होता. आणि महाराष्ट्रातून काँग्रेसची एकमेव सीट निवडून आलेली होती. त्यानंतर त्यांच्या अकाली निधनामुळे तेव्हापासूनच या ठिकाणी लोकसभेची जागा रिक्त होती. आता लोकसभेच्या निवडणुकीची घोषणा काही तासात होईलच. पण अजूनही काँग्रेसमध्ये उमेदवार निश्चिती झालेली नाही. काँग्रेसच्या परंपरेप्रमाणे काँग्रेसचे





महाराष्ट्रातील एकमेव खासदार सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांच्या निधनानंतर त्यांच्या परिवारातील सदस्यांना अर्थात बाळू धानोरकर यांची पत्नी महाराष्ट्र विधानसभेच्या आमदार असलेल्या प्रतिभा धानोरकर यांना ही उमेदवारी दिली जाईल अशी अटकळ बांधली जात होती.

परंतु काँग्रेसची अंतर्गत धुसपुस सर्वश्रुत आहे. त्यामुळे धानोरकर वडेट्टीवार वाद उफाळून आला. आणि ऐन वेळेवर विजय वडेट्टीवार यांनी आपली मुलगी शिवानी हीच्या नावाची शिफारस करत तिला लोकसभेची उमेदवारी मिळावी यासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली. प्रतिभा धानोरकर या 2019 च्या विधानसभा निवडणुकीमध्ये भद्रावती वरोरा विधानसभेतून काँग्रेसच्या उमेदवार म्हणून निवडून आलेल्या आहेत . महिला वर्गामध्ये त्यांचा चांगला दांडगा संपर्क असून तेव्हा जातीचे राजकारण जुळविण्यात त्यांचे पती सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांना चांगलेच यश आले होते. ओबीसी समाजातून येणाऱ्या प्रतिभा धानोरकर यांना ओबीसी समाजाचा चेहरा म्हणून काँग्रेस लोकसभेच्या रणांगणात उतरवणार अशी दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे. परंतु दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचे विरोधी पक्ष नेते असलेले विजय वडेट्टीवार यांनी आपली मुलगी शिवानी वडेट्टीवार ज्या युवक काँग्रेसच्या महासचिव आहेत, त्यांना उमेदवारी मिळावी यासाठी आपली जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे . शिवाय शिवानी वडेट्टीवार यांनी सुद्धा तरुण रक्ताला संधी देण्यात यावी असे म्हणत आपण या निवडणुकीसाठी तयार असल्याचे पक्षश्रेष्ठींना कळविले आहे . यासाठी त्या आपल्या समर्थकांसह थेट दिल्लीलाही धडकल्या होत्या हे विशेष. प्रस्थापितांच्या राजकारणामध्ये शिवानी वडेट्टीवार यांचा झालेला अचानक प्रवेश आणि थेट लोकसभेची उमेदवारी मागण्याची त्यांची भूमिका यामुळे काँग्रेसमध्ये प्रचंड वाद उफाळून आलेला आहे. काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष रितेश तिवारी यांनी काही दिवसांपूर्वीच मित्र पक्षांच्या सहकाऱ्यांसोबत स्थानिक विश्रामगृह येथे बैठक घेत लोकसभेसाठी स्थानिक उमेदवार देण्यात यावा अशी मागणी पक्षश्रेष्ठींकडे केलेली आहे . तर प्रतिभा धानोरकर यांनी पती निधनानंतर या जागेवर आपला अधिकार आहे. त्यामुळे, ही जागा मी सोडणार नाही असे म्हणत आपली आक्रमक भूमिका कायम ठेवलेली आहे. पक्षामध्ये आपल्यासाठी तिकीट मागण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे असे म्हणत त्यांनी शिवानी वडेट्टीवार यांच्या तिकीट मागण्याच्या अधिकाराकडे संयत भूमीकेतून आपली प्रतिक्रिया दिली . मात्र दोन दिवसांपूर्वी त्यांनी त्यांच्या पतीच्या निधनाबद्दल केलेले आरोप यामुळे काँग्रेसमध्ये चांगलीच खळबळ माजलेली आहे. त्यांनी माझ्या पतीचा जीव घेतला आणि आता ते माझ्या मागे लागलेले आहेत. परंतु , मी दुसरा जीव जाऊ देणार नाही, असा घणाघाती आरोप करत आपण लोकसभेच्या रणांगणामध्ये पदर खोचून तयार आहोत . अशी आक्रमक भूमिका प्रतिभा धानोरकर यांनी घेतलेली आहे .दुसऱ्या बाजूला शिवानी वडेट्टीवार या सुद्धा एक तरुण उमेदवार म्हणून युवकांमध्ये लोकप्रिय आहेत . उत्तम संघटन कौशल्य , दांडगा जनसंपर्क आणि विरोधी पक्षनेते असलेल्या विजय वडेट्टीवार यांच्यासारख्या वडिलांचा डोक्यावर असलेला हात यामुळे आता या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये चंद्रपूर वणी आर्णी लोकसभेची जागा नेमकी कोणाला मिळेल याकडे आता चंद्रपूरकरांचे लक्ष लागलेले आहे.

निवडणुकीच्या रणधुमाळीमध्ये भारतीय जनता पार्टीने आपला उमेदवार जाहीर करून निवडणुकीच्या या रणांगणामध्ये पुढाकार घेतला आहे . तर, काँग्रेसच्या अंतर्गत कलाहामुळे अजूनही उमेदवार जाहीर न झाल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये मात्र बरीच अस्वस्थता दिसून येत आहे.

प्रतिभा धानोरकर या ओबीसी चेहरा म्हणून समोर येतील का ? पती निधनानंतर त्यांना सहानुभूतीच्या लाटेचा फायदा मिळेल का ? मराठा ओबीसी आंदोलनाचा फायदा घेत ओबीसी च्या मतांची मोट बांधण्यात त्या यशस्वी होतील का ? आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे चंद्रपूर वणी आर्णी लोकसभेला त्यांच्या रूपाने पहिली महिला खासदार मिळेल का ? की वडिलांचा वरदहस्त घेऊन तरुण उमेदवार म्हणून शिवानी वडेट्टीवार ऐन वेळेवर समोर येतील ? या प्रश्नांची उत्तर लवकरच मिळतील अशी अपेक्षा करू या.

## आ. डॉ. किणीकर यांच्या हस्ते विविध कामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** शहरात खासदार श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून व आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या प्रयत्नातून विविध कामांचा भूमिपूजन समारंभ संपन्न झाला. उल्हासनगर-५ निजधाम आश्रम समोर, गधी रोड येथे कल्याण लोकसभेचे खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे यांच्या संकल्पनेतून तसेच अंबरनाथ विधानसभेचे आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या प्रयत्नाने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकतील विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या कामाचे भूमीपूजन कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळजी लांडगे यांच्या शुभास्ते करण्यात आले.बार्टी अंतर्गत ५० मूले व ५० मुलींची शिक्षण व वस्तीगृहाची व्यवस्था होणार आहे.

तसेच उल्हासनगर-५ येथील ३९ सेक्शन, दुध नाका येथे नविन सुसज्य भाजी मार्केटच्या कामाचे भूमिपूजन,उल्हासनगर-५ जुना पेट्रोल पंप समोर येथे सामाजिक सभागृह (सिंधू भवन) बनविण्याच्या कामाचे भूमिपूजन यावेळी करण्यात आले



यावेळी उपजिल्हा प्रमुख दिलीप गायकवाड, अरुण आशान,उल्हासनगर महानगरप्रमुख राजेंद्र चौधरी,शहर प्रमुख रमेश चव्हाण, भाजप शहरअध्यक्ष प्रदीप रामचंदणी,राष्ट्रवादी काँग्रेस चे शहर अध्यक्ष भरत गंगोत्री, उपशहरप्रमुख परशुराम पाटील,महिला संघटक सौ. मनिषाताई भानुशाली,मा. नगरसेवक सतराम दादा, भगवान भालेराव,नाना बागुल, प्रमोद टाले सौ ज्योती माने, सुरेश जाधव, विकास पाटील,भाजपचे सुनिल सुखेजा, मा. नगरसेविका सौ. मंदाताई सोनकांबळे, सौ. ज्योत्सना भोईर,सौ. समिधा कोरडे,उपशहर प्रमुख संदिप डोंगरे, संदीप गायकवाड नागरिक,पदाधिकारी, कार्यकर्ते, युवासैनिक उपस्थित होते.

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने बामणी प्रोटीन्स लिमिटेडला बंद करण्याचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) बामनी प्रोटीन्स लिमिटेडला जल आणि वायू प्रदूषण नियंत्रण कायद्यांचे उल्लंघन केल्याबद्दल तात्काळ बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष राजेश बेले यांनी दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. कंपनी कमी दर्जाचे सांडपाणी कंपनीच्या आवाराबाहेर सोडत आहे. एमपीसीबी अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासात असे आढळून आले की, कंपनीने सांडपाणी



टाकण्यासाठी पाइपलाइन टाकली होती आणि हे सांडपाणी नाल्यात सोडले जात होते. कंपनीने एमपीसीबीच्या निर्देशांचे पालन केले नाही आणि प्रदूषण नियंत्रण उपकरणे बसवली नाहीत, अशी तक्रार देण्यात आली. त्यानुसार एमपीसीबीने ७ मार्च २०२४ रोजी कंपनीला प्रस्तावित निर्देश जारी केले. कंपनीने ११ मार्च २०२४ रोजी उत्तर दिले, परंतु ते एमपीसीबीला समाधानकारक वाटले नाही. एमपीसीबीने १३ मार्च २०२४ रोजी कंपनीला तात्काळ बंद करण्याचे निर्देश जारी केले.

कंपनीने एमपीसीबीच्या निर्देशांचे पालन केले नाही तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते. एमपीसीबीने वीज वितरण कंपनीला कंपनीचा वीजपुरवठा खंडित करण्याचे निर्देश दिले आहेत. एमपीसीबीने उपप्रादेशिक अधिकारी यांना वरील निर्देशांचे पालन सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत. या विषयी बामनी प्रोटीन्स लिमिटेडचे मानव संसाधन विकास विभाग चे सतीश मिश्रा यांनी सांगितले की कंपनी बंद केले असून कंपनी परिसरातील मागील भागातील कच्चा माल जमा करण्याचे काम सुरू आहे.








## महिला दिनानिमित्त ब्राह्मण महिलामंचच्या वतीने कर्तृत्ववान महिलांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** स्वामी रामानंद तीर्थ हॉल. स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथे महिला दिनानिमित्याने कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. ब्राह्मण महिला मंचच्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आदिती दाशरथी, क्षमा वैद्य, डॉ. चारुलता रोजेकर , मीना झाल्टे यांचें हस्ते कर्तृत्ववान महिलांना शाल , श्रीफल , स्मृतिचिन्ह , प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमांमधे डॉ.सौ. चारुलता रोजेकर यांनाब्राह्मण महिलामंचा योगरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.कर्तृत्ववान महिलांच्या सत्कारामधे निर्मला बडवे , मंगला तांबोळी , शीतल तांबोळी यांना त्यांच्या सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून केलेल्या कार्यासाठी शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह , प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला निर्मला बडवे यांनी पाहुण्यांच्यासाठी मंजुळ स्वरात स्वागतगीत गायले. ब्राह्मण महिलामंचच्या अध्यक्षा विजया कुलकर्णी यांनी ब्राह्मण महिलामंचच्या कार्याविषयी सांगितले. कु .आर्या झाल्टेने नारी शक्तीवर स्वरचित कविता वाचन केले.जयश्री डफळापुरकरने गोंधळ सादर केला.ऋतुजा जोशीनेस्वरचित संस्कृत कविता वाचन केले.सुरेखा काणे यांनी पाणी या विषयावर कविता सादर केली.स्मिता देवळेताई यांनी उंच माझा झोका नृत्य सादर केले. मुग्धा देवचाकेनी नृत्य सादर केले. संगिता पाडळकरनी वडाला फेरे घेते डॉक्टर ही नाट्यछटा सादर केली.विद्या उन्हाळेताईने "बाल मन मी माहेरी जाते " कविता सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनिषा खडकेनी केले.. तर आभार प्रदर्शन डॉ.प्रतिमा भालेनी केले. ब्राह्मण महिलामंचच्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विजया कुलकर्णी, सारिका पाठक, मानसी कुलकर्णी, वंदना कुलकर्णी, दिपाली अवलगावकर या महिलांनी विशेष परिश्रम घेतले.

# ग्रामस्थांच्या वतीने मुख्याध्यापक, शिक्षकांचा सत्कार

## मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमात जि.प. प्रा. शाळा हासेगाव तालुक्यात प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** राज्य शासन शालेय शिक्षण विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमात तालुका स्तरातील मूल्यांकनुसार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हासेगाव केज शाळेने कळंब तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल हसेगाव ग्रामस्थांच्या वतीने शाळेतील सर्व शिक्षकांचा सत्कार समारंभ जिं .प.प्रा. शाळा हसेगाव येथे संपन्न झाला व आंदोरा केंद्राची शिक्षण परिषद हसेगाव येथे पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बळीराम यादव व प्रमुख पाहुणे आंदोरा केंद्राचे केंद्र प्रमुख सोमनाथ चंदनशिव, उपाध्यक्ष परमेश्वर गुळमिरे, भाऊसाहेब यादव, काकासाहेब सोनटक्के, अविनाश काळे, श्रीकांत यादव व समितीचे सर्व सदस्य, ग्रामस्थ



व आंदोरा केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते. स्वच्छ शाळा उपक्रमात शाळेने प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक रामेश्वर जगदाळे व शाळेतील 11 शिक्षक व शिक्षिका आणि सर्व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य यांचा शाल, पुषगुच्छ व मानाचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. तसेच शाळेच्या वतीने केंद्रांतर्गत सर्व मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व उपस्थित पालकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी सर्व उपस्थित मान्यवर शिक्षक व विद्यार्थी यांना भाऊसाहेब यादव व शाळेच्या वतीने अल्पोपहार देण्यात आला. कार्यक्रमात इयत्ता 7 विच्या मुलींनी गुजराती लोकनृत्य व 4 थीच्या मुलींनी ओडिसी लोकनृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. सूत्रसंचालन श्रीमती ज्योती ढेपे यांनी प्रास्ताविक श्रीमती प्रतिभा बिडवे यांनी तर आभार प्रदर्शन राजाभाऊ गुंजाळ यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मेनकुदळे सर, खारके सर, घुटे सर, श्रीमती कोकाटे, श्रीमती मनगिरे, श्रीमती बिडवे, श्रीमती समुद्रे, श्रीमती मेटे, श्रीमती चौधरी यांनी परिश्रम घेतले. कळंब तालुक्यात जि. प. प्रा. शाळा हसेगाव (केज) प्रथम क्रमानं आल्याबद्दल शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# नम्रता पौळ यांची एसटीआयपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची माजी



विद्यार्थिनी कु.नम्रता पौळ हिची एसटीआय या पदावर निवड झालेली आहे.नम्रता पौळ छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील गुणवान अशी माजी विद्यार्थिनी आहे.तिच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव शिवाजी(आप्पा) कापसे, संस्थेचे अध्यक्ष श्याम (नाना) खबाले , संस्थेचे सहसचिव प्रा.संजय घुले, संस्थेचे कोषाध्यक्ष बाळकृष्ण गुरसाळे, त्याचप्रमाणे संस्थेचे उपाध्यक्ष मा.प्रा. अविनाशजी मोरे सर व महाविद्यालयाचे प्राचार्य. शशिकांत जाधवर तसेच महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यानी मनापासून अभिनंदन केले व तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# भोकर तालुका काँग्रेसच्या अध्यक्षपदी गोविंद गौड यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस पक्षाला



गळती लागल्याने वरीष्ठिनी जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. गुरूवारी (ता.१४) येथील राजकीय क्षेत्रातील जेष्ठ कार्यकर्ते तथा काँग्रेस पक्षाचे माजी उपनगराध्यक्ष गोविंद बाबा गौड पाटील याची तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. भोकर विधानसभा मतदारसंघ तसा प्रारंभी पासून काँग्रेस पक्षाचा गड म्हणून राजकीय क्षेत्रात दबदबा होता. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अचानक भाजपाशी घरोबा केल्याने काँग्रेसची वाताहत झाली. सदरील पोकळी भरून काढण्यासाठी वरिष्ठ पातळीवरून हालचाली सूरू झाल्या आहेत.पक्षाला नवी उभारी देण्यासाठी नूतन पदाधिकाऱ्यांची मोट बांधणीस वेग आला आहे. माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश देशमुख भोसीकर, बाळासाहेब पाटील रावणगावकर, गोविंद बाबा गौड पाटील यांच्यासह अन्य कार्यकर्ते पक्षाशी एकनिष्ठ राहुन काम करण्याचा निश्चय केला आहे.काग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि जिल्हा अध्यक्ष बी.आर.कदम यांनी जिल्ह्यातील नूतन पदाधिकाऱ्यांची कार्यकारिणी घोषित केली आहे.यात प्रामुख्यानी येथील तालुका अध्यक्षपदासाठी माजी सरपंच तथा नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष गोविंद बाबा गौड याची गूरूवारी निवड जाहीर केली आहे.काग्रेस पक्षाची विस्कटलेली घडी पूर्वपदावर आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले जात आहेत.निवड घोषीत होताच कार्यकर्त्यांनी ढोल ताशा, फटाक्यांची आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा केला आहे. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहेत. काग्रेस पक्षानी माझ्या सारख्या सामान्य कार्यकर्त्यांला तालुका अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे. तळागाळातील लोकांपर्यंत पक्षाची ध्येयधोरणे पोहचवुन सर्व सहकारी बांधवाला विश्वासात घेऊन कठीण परिस्थितीवर मात करून मी निष्ठेनी काम करत राहिल.

# रेल्वे रुळाखालील ब्रिजची रुंदी व उंची वाढविण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** विठ्ठलवाडी येथे वालधुनी उपनदी पात्रात सरकारी आरक्षित भुखंडावर बीओटी तत्वावर माधव कंन्स्ट्रक्शन द्वारे सुरु असलेल्या प्रकल्पाच्या संरक्षक भिंतीमुळे भविष्यात वालधुनी नदीपात्रा लगतच्या रहिवाशी भागात वांरवार पुराचे पाणी गोरगरिबांच्या घरात घुसुन मालमत्तेचे नुकसान होणार हा संभाव्य धोका लक्षात घेवुन गेल्या अनेक दिवसांपासून सुरु असलेल्या पाठपुराव्या नंतर भारतीय जनता पक्षाच्या शिष्ठमंडळाने कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या आयुक्त मा.डॉ. इंदुराणी जाखड यांची भेट घेवुन विठ्ठलवाडी स्मशानभुमी जवळील ब्रीज व रेल्वे रुळाखालील ब्रीजची रुंदी व उंची वाढविण्याची मागणी केली. तसेच नदीतील गाळ पावसाळ्यापुर्वी पुर्णता काढण्याबाबत सुचवले जेणेकरुन वालधुनी नदीपात्रालगतच्या रहिवाशी भागास पुराचा



कृत्रिम धोका उद्‌भवणार नाही. सोबतचं भारतीय जनता पक्षाच्या शिष्ठ मंडळाने कायमस्वरुपी उपाय योजना करण्यासाठी आयुक्तांनी सदर ठिकाणी स्वतः प्रत्यक्ष भेट देण्याची विनंती केली त्यानुसार आयुक्त मॅडम 15 मार्च दुपारी 2 वाजता स्वतः भाजप शिष्ट मंडळासोबत पाहणी करण्यास उपस्थित झाल्या. सदर प्रसंगी स्थानिक पुरग्रस्त नागरिक व महिला वर्गाने आयुक्त मैडम यांना आपल्या समस्या सांगीतल्या.

# जिल्हा संघटकपदी संजय चिंचोळकर

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** अनेक वर्षांपासून लोकस्वराज्य आंदोलनाच्या



वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवून विधायक कामाला प्राधान्य देण्यात येत आहे. येथील तालुका अध्यक्ष म्हणून सामाजिक कार्यकर्ते संजय चिंचोळकर याची एकमताने निवड करण्यात आली आहे. येथील शासकीय विश्रामगृहात गूरूवारी लोकस्वराज्य आंदोलन महाराष्ट्र आयोजित तालुकास्तरीय कार्यकर्ता संवाद बैठक व नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी कवी गायक माधव वाघमारे, कृष्णूरकर तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक रामचंद्र भरांडे, बाळासाहेब टिकेकर, जिल्हा कोअर कमिटीचे माणिक कांबळे, जिल्हाध्यक्ष युवक आघाडी नांदेड उत्तरचे अंकुश गायकवाड, जिल्हाध्यक्ष युवक आघाडी दक्षिण जिल्हा, धोंडोपंत बनसोडे, यांची उपस्थिती होती. तालुका कार्यकारणीत जिल्हा संघटक पदी सामाजिक कार्यकर्ते संजय गज्जीराम चिंचोळकर, जिल्हा उपाध्यक्ष उत्तरपदी साईप्रसाद जळपतराव, तालुकाध्यक्ष पदी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते- सुनिल मुकिंदा जाधव जाक्कापुरकर, तालुका कार्याध्यक्षपदी-मारोती टिकेकर,तालुका उपाध्यक्षपदी सरपंच साहेबराव भुजंगराव कांबळे, तालुकाध्यक्ष कामगार आघाडी पदी साहेबराव झुंजारे, तालुकाध्यक्ष युवक आघाडी पदी गोविंद मनपुर्वे चिकाळेकर,तालुका उपाध्यक्ष युवक आघाडी माणिक टिकेकर,तालुका उपाध्यक्ष कामगार आघाडी पदी माधव संभाजी गायकवाड बोरगांवकर, तालुकाध्यक्ष,महिला आघाडीपदी सौ. रत्नमाला संजय तपासकर,तालुकाध्यक्ष विद्यार्थी आघाडी पदी युवा कार्यकर्ता वामन प्रकाश कराळे,तालुकाध्यक्ष ऑटो युनियन आघाडी पदी दीपक बोईवार तालुका उपाध्यक्ष ऑटो युनियन आघाडी संदीप करंडेकर,तालुका उपाध्यक्ष विद्यार्थी आघाडी पदी सचिन करंडेकर आदीची निवड करण्यात आली.तर यावेळी दिगंबर चांदू वाघमारे, दशरथ आनंदा वाघमारे यांची उपस्थित होती. सुत्र संचालन साईनाथ जळपतराव यांनी केले तर आभार प्रदर्शन मारोती टिकेकर यांनी केले आहे.

# बोलीचं अस्सलपण जपून ठेवण्याचं काम बन्सोड यांनी केले : डॉ. जोशी



आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर येथील मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. विद्याधर बन्सोड यांचे 'आंबेडकरी वाङ्मय विचार', 'मोनास पत्रं', 'माझी माय म्हणायची' तसेच 'विद्याधर बन्सोड : व्यक्ती आणि वाङ्मय' या गौरवग्रंथाचे लोकार्पण रातुम नागपूर विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख तसेच समीक्षक डॉ. शैलेंद्र लेंडे यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी व विचारवंत डॉ. भालचंद्र जोशी अध्यक्षस्थानी उपस्थित होते. या प्रसंगी डॉ.विद्याधर बन्सोड यांच्यावर प्रेम करणाऱ्या अनेक जिल्ह्यातील लोकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली होती. सुप्रसिद्ध कवी लोकनाथ यशवंत, श्री शिवाजी महाविद्यालय राजुराचे प्राचार्य डॉ.संभाजी वारकड, विवेक पत्तीवार यांनी डॉ. विद्याधर बन्सोड यांचे व्यक्तित्व व त्यांचे वाङ्मय यावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.इसादास भडके यांनी केले. डॉ. विद्याधर बन्सोड यांच्या षष्ट्यब्दीपूर्ती निमित्त मानपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. मानपत्राचे वाचन शुद्धोधन मेश्राम यांनी केले.या निमित्ताने डॉ. विद्याधर बन्सोड तसेच सौ. जया बन्सोड यांची प्रकट मुलाखत कवयित्री गीता रायपुरे तसेच गोपाल शिरपूरकर यांनी घेतली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी इरफान शेख यांनी केले. डॉ.विद्याधर बन्सोड यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीचे आयोजन आसन्या फाउंडेशन, आंबेडकरी साहित्य प्रबोधिनी, सूर्यांश साहित्य व सांस्कृतिक मंच,डॉ. विद्याधर बन्सोड माजी विद्यार्थी संघ, स्व.विणा आडेकर स्मृती प्रतिष्ठान भद्रावती, विदर्भ साहित्य संघ गोंडवन शाखा,चंद्रपूर, फिनिक्स साहित्य मंच चंद्रपूर, 'सृजन' चंद्रपूर, समाजोत्थान अंध अपंग सामाजिक कल्याणकारी संस्था यांनी केले. डॉ. विद्याधर बन्सोड मित्रपरिवार साहित्य - सांस्कृतिक संस्था चंद्रपूर तसेच गौरवग्रंथाचे संपादक डॉ. नागसेन शंभरकर, सौ.मोनिका बन्सोड- मून, प्रदीप देशमुख, डॉ. इसादास भडके, इरफान शेख,सजावटकार रोहीत गाडगे, मुखपृष्ठकार सुदर्शन बारापात्रे तसेच विनीत बन्सोड यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# विधवा महिलांना कर्जमुक्ती केव्हा ?

## शासनाकडून विधवा महिलांची अवहेलना : प्रा. येलेकर

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** कोरोनामुळे विधवा झालेल्या महिलांना थकीत कर्जातून मुक्तता देण्यासंदर्भात शासन स्तरावर निर्णय घेण्यासाठी सहकार आयुक्तांनी राज्यातील सर्व विभागीय निबंध व जिल्हा निबंधकांना 11 नोव्हेंबर 2022 व 16 जानेवारी 2023 च्या आदेशान्वये माहिती गोळा करून ती माहिती 20 जानेवारी 2023 पर्यंत सादर करण्याचे निर्देश दिले होते. या आदेशामुळे मृतकर्जदाराच्या विधवा महिलांच्या कर्जमुक्त होण्याच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. परंतु आता एक वर्ष उलटून सुद्धा विधवा महिलांना कर्जमुक्तीचा दिलासा मिळाला नाही. त्यामुळे आता हे कर्ज कसे फेडायचे ? असा मोठा प्रश्न त्या विधवा महिलांसमोर आहे. राज्य सरकारने येणाऱ्या लोकसभा डोळ्यासमोर ठेवून मते मिळवण्यासाठी 11 व 12 मार्च या दोन दिवसात जवळपास 250 चे वर शासन निर्णय निर्गमित करून हजारो करोड रुपयाच्या सोयी सुविधा जनतेला दिल्यात. तर केंद्र सरकारने उद्योगपतींचे 16 लाख कोटींचे कर्ज माफ केले. परंतु मृतक कर्जदारांच्या विधवा महिलांच्या कर्जमुक्ती कडे मात्र मागील एक वर्षापासून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप गडचिरोली जिल्हा सहकारी पतसंस्था संघाचे मानद सचिव तथा सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष प्रा. शेषराव येलेकर यांनी केला आहे. एकीकडे महिलांच्या उन्नतीसाठी राज्यात महिला धोरण जाहीर करून आम्ही महिलांचे तारणहार असल्याचा गाजावाजा करायचा आणि दुसरीकडे मात्र त्याच राज्यातील विधवा महिलांना मागील एक वर्षापासून कर्जमुक्तीचे गाजर दाखऊन त्यांची अव्हेलना करायची हा कुठला न्याय आहे ? असा सवाल प्रा. येलेकर यांनी केला आहे.

कोविड 19 या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे अनेकांवर आर्थिक अडचणी ओढविल्या. ज्या कुटुंबातील कर्तापुरुष कोरोनात मृत्यू पावला त्या कुटुंबांना मोठी आर्थिक झड बसली आहे. त्या कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी कर्ता पुरुषाच्या विधवा पत्नीवर आली आहे. मयत कर्जदाराचे राहते घर इतर मालमत्ता तारण असल्यास अशावेळी त्याच्या कुटुंबावर बेघर होण्याची पाळी आली आहे, या संदर्भात जिल्हा उपनिबंधक कार्यालयातून विचारणा केली असता शासनाने मागितलेली माहिती दिलेल्या वेळेत सहकार आयुक्त कार्यालय पुणे येथे पाठवण्यात आली, परंतु अजून पर्यंत कोणताही निर्णय शासन स्तरावर झाला नसल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले. नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा प्रश्न निकाली लागून मृतकर्जदाराच्या विधवा महिलांना थकीत कर्जातून मुक्तता मिळेल असे वाटत होते, परंतु त्या अभागी महिलांच्या पदरी मात्र निराशाच आली. पुढील लगतच्या काळात तरी विशेष बाब म्हणून सदर विधवा महिलांना कर्जमुक्ती मिळेल काय ? असा प्रश्न प्रा. शेषराव येलेकर यांनी शासनाला केला आहे.



# संत रामदास महाविद्यालय तालुक्यातील सांस्कृतिक केंद्र बनवण्याचा मानस : विनायक चोथे

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** सामाजिक विकासासाठी संत रामदास महाविद्यालय हे तालुक्यातील सांस्कृतिक केंद्र बनवण्याचा मानस असून ते फक्त विद्यार्थी केंद्रित न ठेवता समाजातील विविध घटकांचे ऋण फेडण्यासाठी विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात येत असते, असे प्रतिपादन स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री विनायक चोथे यांनी संत रामदास महाविद्यालयात आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमात. यावेळी व्यासपीठावर डॉ चंद्रिका मस्के, ॲड. आशा गाडेकर, सौ. योगेश्वरी देशमुख, पोलीस अधिकारी अल्का केंद्रे, मुख्याध्यापिका श्रीमती मंचाळ, मोहपुरीच्या सरपंच कौशल्याबाई साळवे, ॲड. अंजली कुलकर्णी आदीसह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर के परदेशी उपप्राचार्य प्रमोद जायभाये, युवा सेना जिल्हा अध्यक्ष गणेश काळे व सचिन चिमणे, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने व जिजाऊ वंदनाने करण्यात आली. श्री चोथेपुढे म्हणाले की भारतीय संस्कृतीने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा सन्मान न देता त्या पलीकडील पुढचा सन्मान दिला असून पुरातन काळापासून स्त्रियांना सन्मानित केले जात आहे. आज समाजात स्त्रियांच्या संदर्भात अनेक समस्या निर्माण झाल्या असून बालविवाह मोठ्या प्रमाणात होत असून राजकीय पुढारी अशा विवाहाला हजेरी लावतात. मतांच्या लालसे पोटी ते गप्प बसतात, विरोध करू शकत नाहीत. तर विधवा विवाहाला आजही समाजात मान्यता मिळात नाही .समाजात स्त्रियांचा 50% सहभाग असताना देखील त्यांना विकासापासून कोसो दूर ठेवले जात आहे, शिवाय त्यांचे उभे आयुष्य जाळले जाते . अशा प्रकारचा अधिकार समाजाला कोणी प्राप्त करून दिला असे ते म्हणाले. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ आर के परदेशी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मारोती घुगे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. प्रमोद जायभाये यांनी केले. यावेळी डॉ. चंद्रिका मस्के, सौ. उज्वला साळवे, सौ. सोनाली होंडे, सौ. एल. टी. बुलबुले, यशस्वी व्यावसायिका सौ इदलकर, सौ. अलका केंद्रे, सौ. प्रेरणा, डॉ. प्रियंका गवळी, सौ. प्रियंका वाघ, डॉ. गौरी कुलकर्णी, ॲड. अंजली कुलकर्णी, नगरसेविका सौ. योगेश्वरी देशमुख, ॲड. आशाताई, मोनिका मगरे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले सदरील कार्यक्रमात विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कामचुकार वैद्यकीय अधिकाऱ्यांची हकालपट्टी करण्यासाठी सुलतानपूर ग्रामपंचायतने घेतला ठराव

आधुनिक केसरी न्यूज



**लोणार :** सुलतानपूर प्राथमिक केंद्रा अंतर्गत २५ ते ३० खेडे येतात. व मुंबई नागपूर हायवे सुलतानपूर शहरांमधून गेल्यामुळे रात्री बे रात्री अनेक इमर्जन्सी पेशंट येतात. त्या पेशंटला प्राथमिक उपचाराची अत्यंत गरज असते परंतु येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी त्या ठिकाणी वेळेवर हजर नसतात व एखाद्या वेळेस ड्युटी हजर असले तर पेशंट सोबत अरेरावीची भाषा करून तुच्छपणाची वागणूक देतात. अनेक वेळा पेशंटच्या नातेवाईकानी तक्रारी करून सुद्धा आजपर्यंत कार्यवाही न झाल्याने. सुलतानपूर ग्रामपंचायतने हकालपट्टी करण्या संदर्भात ठराव घेतला. अशा बेजबाबदार अधिकाऱ्याची तत्काळ हकलपट्टी करून चांगली सेवा देणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन तालुका आरोग्य अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी चौकशी टीम चौकशी संदर्भात सुलतानपूर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आले असता. त्याच्याकडे देण्यात आले.
तसेच ग्रामपंचायतचा ठरावसुद्धा निवेदनासोबत देण्यात आला. यावेळी निवेदन देताना नागवंशी संगपाल पनाड, ग्रामपंचायत सदस्य संतोष शिंदे, शे.अमीर भाई, गोपाल भानापुरे, शिवराज निलक, सद्दाम भाई उपस्थित होते.



# स्वच्छतागृह असतानाही महिला वारकऱ्यांची होतेय कुचंबणा!

## बांधकाम होऊन तीन वर्षे तरीही शौचालय कुलूपबंदच

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** नाथषष्ठी सोहळ्यात किमान सात लाखाच्या आसपास वारकरी भाविक पैठण शहरात येतात या ठिकाणी संत एकनाथ महाराज मंदिर परिसरात दोन सौचालय बांधकाम करण्यात आले आहे.मात्र ते अद्यापही वारकरी भाविकासाठी खुले नसते गेल्या तिन वर्षांपासून कुलूपबंद का आहे हा प्रश्न वारकरी करत आहे. तिर्थक्षेत्र पैठण नगरीत महिलांसाठीचे शौचालय व स्वछतागृहांची कमतरता आसुन यात्रा काळात सौचालयचा वाफर करणाराकडुन पैसे घेतल्या जातात. तिर्थक्षेत्र असल्याने दर एकादशीला ही पैठणला दर्शनार्थी येतात. यात महिला भक्तांची संख्या पन्नास ते साठ टक्के आहे. तिर्थक्षेत्री भाविकांची संख्या वाढत असताना स्वछतागृह बांधून पाणी पुरवठा नसल्याने वाफरात आल्याने बंद ठेवण्यात येते. मात्र दर वर्षी नाथ महाराज षष्ठी सोहळ्यात आलेल्या वारकऱ्यांची मंदिर परिसरातील सौचालय बंद राहत आसल्याने यामुळे वारकरी भाविकांची मोठी कुचंबणा होत असल्याने त्यांना उघड्यावर मुलभुत गरज भागविण्यासाठी जावे लागत आहे. यंदा तरी मंदिर परिसरातील सौचालय नाथ षष्ठी ला वारकऱ्यांसाठी खुले करण्यात यावे अशी मागणी जोर धरत आहे.

नाथ महाराज षष्ठी सोहळ्याची प्रशासनाकडून वारकर्यांना सोई सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक प्रशासन सज्ज झाले असुन वारकर्यांना आजही उघड्याव सौचास जावे लागत आहे, मंदिर परिसरात दोन मोठे सौचालय बांधकाम गेल्या दिन वर्षांपासून बांधून ठेवले परंतु अद्यापही ते सौचालय कुलुपबंद का आहे हा प्रश्न वारकर्यांना आहे .परंतु प्रशासनाने आता तात्काळ मंदिर परिसरातील सौचालय वारकरी व भाविकांसाठी खुले करण्यात येवून भाविकांची कुचंबणा थांबवा .
**ह .भ .प .विलास महाराज मोरे, वारकरी प्रवाह, परिवार पैठण**

# राष्ट्रनिर्माणाचे स्वप्न उराशी बाळगत भाजपाची वाटचाल

## सुधीर मुनगंटीवार : काँग्रेसच्या ५९३ कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** भद्रावती तालुक्यातील काँग्रेसच्या शेकडो पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पार्टीच्या विचारांचा स्वीकार करीत व विकासाच्या झंझावाताचे समर्थन करीत पक्षात प्रवेश केला. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर-वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. १२ मार्च २०२४ रोजी भद्रावती येथे काँग्रेसच्या ५९३ कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भारतीय जनता पार्टीची ध्येय धोरणे राष्ट्रनिर्माण करणारी आहेत. प्रगतीच्या दिशेन घेऊन जाणारी आहेत. त्यामुळे भारतीय जनता पार्टीचा विचार प्रत्येक नागरिकापर्यंत घेऊन जाण्याचे कार्य करणार आहात. त्यामुळेच आपण भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. सर्वांचे भारतीय जनता पार्टीत स्वागत आहे, असे ना. श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार म्हणाले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे , माजी जिल्हा महामंत्री नामदेव डाहुले, चंदुजी गुंडावार, रमेश राजुरकर, नरेंद्र जिवतोडे, प्रविण सातपुते, संतोष आमणे, प्रविण सातपुते, संतोष आमणे, किशोर गोवारदिपे, रुपेश मांडरे, संतोष नागपूरे, प्रविण नागपूरे, विजय वानखेडे, अमित गुंडावार, इमरान शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश घेतला.
भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये काँग्रेसचे मुख्य नेते सिकंदर भाई शेख व पप्पू शेख यांच्यासोबत इस्माईल शेख, सूरज पेंदाम, प्रीतम देवतळे, प्रफुल्ल भोस्कर, योगेश नागपुरे, वैभव मेश्राम, प्रवीण सिंग, शाहिद सय्यद, अभिषेक घुबडे, उत्तम पोईनकर, विकी सोनुने, संकेत सातपुते, प्रशांत लांडगे, जुनेद खान, अथर्व भाके, आकाश नागपुरे, पवन नागपूर, शैलेश वाभिटकर, अमित घोडमारे, दीपक कुळमेथे, अनिल रुयारकर, ऋतिक जाधव, कुणाल बटरवाल, आवेश सय्यद, प्रफुल्ल वानकर, राजू किन्नाके, ऋतिक माकोडे, आतिश डोंगरे, चंद्रभान नागोसे, बंडू ढेंगळे, देवराव टेकम, सुधीर ठाकरे, नरेश त्रिवेदी, नितेश मेहता, सागर सदमवार, अक्षय सदमवार, गणेश पचारे, विनोद कुमार, विनोद प्रसाद, रोहित यदुवंशी, मनोज चौधरी, शाहरुख शेख, सलाउद्दीन सिद्दीकी, आमिर शेख, अय्युब खान, सूरज दुर्गे, सूरज पिंपळशेंडे, गौरव माडी, किशोर चौधरी, सिकंदर गोतकोंडावार आदींचा समावेश आहे.



# केंद्रीय रेल्वे मंत्री रावसाहेब दानवे यांनी घेतले साईंचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** केंद्रीय रेल्वे राज्य मंत्री रावसाहेब दानवे यांनी शिर्डी येथे येऊन श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी संस्थानचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे नगरसेवक सुजित गोदकर जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके मंदिर प्रमुख रमेश चौधरी उपस्थित होते यावेळी दानवे याचा साईबाबा संस्थानच्या वतीने उप कार्यकारी आधिकारी तुकाराम हुलवळे यांनी त्यांचा साई प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. रावसाहेब दानवे पाटील, केंद्रीय रेल्वे राज्य मंत्री, भारत सरकार यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतत्यानंतर त्यांचा सत्कार करताना संस्थानचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे आदी.

# अचानक उन्हाचा पारा चढला, उकडा वाढला

## दैनंदिन कामांवर परिणाम

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये सर्वत्र अचानक उन्हाचा पारा चढला असुण दैनंदिन कामांवर याचा परिणाम जाणवत असल्याचे चित्र आहे. मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात अचानकपणे उन्हाचा पारा चढला आहे तर उकडाही वाढला आहे. एप्रिल मे महिना पुढेच असताना मार्च मधेच कडक उन्ह अंगाची लाही लाही करत आहे. तर सोबतच उकडा वाढल्याने नागरिक हैराण परेशान होत आहे. कडक उन्हाचा तडाखा दैनंदिन कामांवर होत आहे. कडक उन्हामुळे कामे करने शक्य होत नाही.सकाळीच दहानंतर कडक उन्ह पडत असल्याने सकाळी सकाळीच काम होत आहे दुपारी तर कडक उन्ह पडत असल्याने कामे करने शक्य होत नाही.दुपारी रस्त्यावर ही वाहतुक तुरळक होत आहे. गुरे ढोरे नागरिक सर्व उन्ह बघता सावली ची वाट धरत आहे. शेतीकामे व इतर अन्य कामे कडक उन्हामुळे करणे शक्य होत नसल्याने सकाळि सकाळीच सावलीत होत आहे. एप्रिल - मे ऐवजी मार्च मधेच कडक उन्हाने नागरिकांना हैराण परेशान केले आहे.तर मग एप्रिल मे ची कल्पना करणे आशक्य आहे. हे विशेष.



# सोयगाव शिवारात रानडुकरांमुळे ज्वारीचे पीक झाले आडवे; शेतकऱ्यांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** परिसरातील दहा ते पंधरा गावांच्या शिवारात रानडुकरांनी धुमाकूळ घातला असून, कापणीसाठी आलेल्या रब्बीच्या मका, गहू, ज्वारी आदी पिकांचे त्यांच्याकडून नुकसान केले जात आहे. सोयगावसह परिसरातील गलवाडा, वेताळवाडी, कंकराळा, माळेगाव, पिंपरी, जरंडी, निंबायती, बहुलखेडा, निमखेडी, उमर विहिरे या गावांच्या शेतशिवारात रानडुकरांच्या कळपाने गेल्या काही दिवसांपासून धुमाकूळ घातला आहे. ही रानडुकरे रब्बीच्या वाढलेल्या पिकांमध्ये दबा धरून बसतात. तसेच या पिकांचे नुकसान करतात. त्यामुळे उभी पिके आडवी झाली आहेत. याबाबत शेतकऱ्यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली आहे; परंतु गेल्या दोन दिवसांपासून वन विभागाचा एकही अधिकारी इकडे फिरकलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकांना वाचवण्यासाठी पहारा द्यावा लागत आहे. अशात रानडुकरांकडून हल्ला केला जाईल, अशी भीती शेतकऱ्यांना वाटत असल्याने ते जीव मुठीत घेऊन पिकांचे रक्षण करत आहेत. वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.



# पाझर तलावाची दुरवस्था; गौण खनिजाचेही अवैध उत्खनन, पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** बरंजळा साबळे येथील पाझर तलावाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे.झाडाझुडपांनी वेढलेल्या भिंतींना जंगलाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.ठिकठिकाणी भिंतीला तडे गेले आहेत.धरणाची पाळू फुटल्याने दरवर्षी लाखो लिटर पाणी वाहून जात आहे.त्यामुळे रब्बी हंगामात शेतकऱ्यांना पाणी समस्यांना तोंड द्यावे लागते.सिंचनक्षेत्र कमी झाल्याने त्याचा थेट परिणाम उत्पन्नावर होत आहे. धरणामधून अवैधरित्या गौण खनिज संपत्तीचे मोठ्या प्रमाणात उत्खनन होत असून वेळोवेळी पाठपुरावा करूनही पाटबंधारे विभाग याकडे जाणूनबुजून  दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पाझर तलावाची दुरावस्था झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.धरण सुरक्षा यंत्रणा नुसती नावालाच आहे का, धरणाची नियमितपणे निगराणी का राखली जात नाही, कर्मचारी नियमित उपस्थित का रहात नाहीत.यासारख्या प्रश्नांची विचारणा केली जात आहे.शासनाकडून धरण दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो त्यातून पाझर तलावाची दुरुस्ती करावी अशी मागणी वारंवार करूनही पाटबंधारे विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.यावर्षी धरणाची दुरुस्ती न झाल्यास आंदोलनचा इशारा  शेतकऱ्यांनी दिला आहे.





बरंजळा साबळे पाझर तलाव शेतकऱ्यांसाठी वरदान ठरला आहे . बागायती क्षेत्र वाढल्याने उत्पन्नातही भर पडली आहे . परिसरातील शेतकऱ्यांनाही याचा फायदा होत आहे .याच धरणामुळे गावची तहान भागते आहे .परंतु दिवसेंदिवस धरणाची दुरावस्था वाढतच आहे .भिंतीस तडे गेलेआहेत पाळू फुटली आहे . लाखो लिटर पाणी वाहून जात आहे . निवेदने देऊनही दुर्लक्ष केले जाते .संबंधित विभागाने वेळीच लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांना सोबत घेऊन आंदोलन करण्यात येईल .

**संतोष साबळे, शेतकरी ,बरंजळा साबळे**

मान्सूनपूर्व दुरुस्तीसाठी शासनाकडून निधी येत असतो . मागील काही वर्षापासून अद्यापही निधी प्राप्त झाला नाही . धरण सुरक्षा संघटनेकडे तशी मागणी केली आहे .या विभागात  धरण संख्येच्या प्रमाणात मनुष्यबळ कमी आहे . अवैधरित्या गौण खनिज उत्खनन हा विषय महसूल विभागाशी संबंधित आहे . या अगोदरही मंडळाधिकारी, तहसीलदारांना कळविले आहे . पुन्हा स्मरण करून दिले जाईल .धरण सुरक्षा व देखभाल याकडे गांभीर्याने लक्ष दिले जाईल .

**एस .जी .राठोड, शाखाधिकारी,पाटबंधारे विभाग,भोकरदन**

# विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जागतिक महिला दिनानिमित्त व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**अमळनेर :** 13 मार्च रोजी पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर येथील एम एस डब्ल्यू द्वितीय वर्षात क्षेत्र लकार्य करणाऱ्या विद्यार्थ्यां तर्फे देवळी ग्राम पंचायत ता. अमळनेर, जि. जळगाव येथे क्षेत्रकार्याचे विद्यार्थ्यांनी  राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने दिनांक 13 मार्च 2024 रोजी महिला सक्षमीकरण या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. व्याख्यानाच्या प्रमुख मार्गदर्शक व क्षेत्रकार्य पर्यवेक्षक प्रा .डॉ.  अस्मिता सरवैया यांनी सांगितले की, ग्रामीण महिलांमध्ये क्षमता खूप असतात, त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या नैसर्गिक क्षमतांचा योग्य उपयोग करून कौटुंबिक विकास आणि पर्यायाने देशाच्या विकासासाठी हातभार लावला पाहिजे. महिला म्हणून कुठेही कमी पडता कामा नये, स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून आणि इतर शासकीय योजनांच्या मदतीने सर्वांगीण विकास साध्य केला पाहिजे. अशी अपेक्षा व्यक्त केली. क्षेत्रकार्य समन्वयक प्रा. डॉ. जगदीश सोनवणे यांनी क्षेत्रकार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी व भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमासाठी गावातील महिला भगिनी, प्राथमिक शाळेतील शिक्षक वृंद, महिला शिक्षिका, बचत गटातील महिला, अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस, ग्रामसेवक सरपंच क्षेत्रकार्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. जगदीश सोनवणे एम. एस. डब्ल्यू दुतीय वर्षाचे क्षेत्र कार्य प्रशिक्षणार्थी, बी. एस.डब्ल्यू. प्रथम, द्वितीय वर्षाचे विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला. यावेळी कार्यक्रम सूत्रसंचलन सौ. प्रतिभा वाल्हे यांनी केले तर आभार अविनाश वळवी यांनी मानले. इंदास वळवी, पिंटू वळवी, निलेश वळवी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



# माध्यमांच्या जाहिरातीबाबत अन्यायाची भूमिका

## व्हॉईस ऑफ मीडियाचा आरोप : मुख्यमंत्री भेटीसाठी वेळ देईनात

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** माध्यमांना देण्यात येणाऱ्या जाहिरातींबाबत सातत्याने अन्यायाची भूमिका घेतली जात आहे. सरकार आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभाग याला जबाबदार आहे. सरकार आता निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून ही भूमिका घेत आहे. हा अन्याय थांबवा. माध्यमांना नियमाप्रमाणे जाहिराती द्या. जाहिरातीचे देयके वेळेवर काढा. अन्यथा आंदोलनाचे हत्यार उपसावे लागेल, असा इशारा 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी दिला आहे.

६ ते ८ मार्च या दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा दैनिक वृत्तपत्रांना विकसित भारत व विकसित महाराष्ट्रच्या दर्शनी जाहिरात वितरित करण्यात आलेल्या आहेत, परंतु या जाहिराती वाटपात महाराष्ट्रातील साप्ताहिकांना डावलण्यात आले. असे का? विशेष मोहिमेंतर्गत एका जाहिरातीखेरीज काही समकक्ष दैनिकांना अधिकच्या जाहिरातींचे वितरण करण्यात येत आहे. असे का? बाकी दैनिकांनी काय पाप केले, असा प्रश्न 'व्हॉईस ऑफ मीडिया 'ने उपस्थित केला आहे.

जाहिरात वितरण करताना या विभागाचा आळसीपणा पुढे येत आहे. जर रात्री अकरा वाजता जाहिराती मिळत असतील तर, ती जाहिरात पानावर लावून अंक छपाईसाठी द्यायचा कधी, हा प्रश्नही निर्माण होतो. अनेक जाहिरातीची बिले २०१९ पासून निघालेली नाहीत. म्हणजे १९ ते आत्ता २४ पर्यंत अनेक बिलांची देयके तशीच प्रलंबित आहेत. जाहिराती मिळत नाहीत, मिळाल्या तर त्या देताना विलंब केला जातो, दिल्या तर त्याचं बिल चार चार वर्षे थकवले जातात. हा सगळा कारभार छोट्या दैनिकांना, आणि साप्ताहिक, मासिक यांच्या मालक, संपादक, पत्रकार यांना प्रचंड यातना देणारा आहे. हा अन्याय आहे. या बाबत 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत अनेक वेळा सरकार आणि माहिती महासंचालनालय यांना पत्रव्यवहार केला. त्यांच्या कार्यालयासामोर उपोषण केले. विकसित भारत व विकसित महाराष्ट्रच्या दर्शनी जाहिरात राज्यातील साप्ताहिक यांना का दिली नाही, असा जाब विचारत 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या शिष्टमंडळाने राज्याचे माहिती व जनसंपर्क महासंचालक ब्रिजेश सिंह, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक डॉ. राहुल तिडके यांची भेट घेतली. ब्रिजेश सिंह यांनी या संदर्भात बजेटचा विषय आहे, असे उत्तर दिले. तर तिडके यांनी ठरवून दिलेल्या नियमावलीत आम्ही काम केले आहे, असे सांगितले.

याच विषयांच्या अनुषगाने गेल्या आठ दिवसांपासून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आम्ही भेटण्याचा प्रयत्न करतोय, पण ते भेटण्यासाठी वेळ देत नाहीत, असे 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के यांनी सांगितले.



**निवडणुका डोळ्यासमोर ठेवून शासनाची दुपटी भूमिका : संदीप काळे**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभाग राज्य सरकारच्या इशारावर चालतोय, हे साप्ताहिकांना जाहिराती न देऊन पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. आता निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सरकारची दुप्पटी भूमिका सुरु आहे. छोटी माध्यमे शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतात. त्या माध्यमांच्या जाहिराती बंद करून सरकार काय साध्य करू पाहते, असा सवाल आहे. काही ठराविक दैनिके, साप्ताहिके, मासिके याबाबत ही दुपट्टी भूमिका जर सरकारने आणि राज्याच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभागाने थांबवली नाही तर, व्हॉईस ऑफ मीडियाला उपोषणाचे हात्यार उपसावे लागेल, असा इशारा 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी दिला आहे.



# विविध पक्षातील कार्यकर्त्यांचा काँग्रेस प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पाथ्री गावातील भाजपा सह शिवसेना राष्ट्रवादी पक्षातील पद अधिकारी सहकार्यकर त्यांनी काँग्रेसमध्ये नुकताच प्रवेश केला छत्रपती संभाजी नगर येथे जिल्हा अध्यक्ष डॉक्टर कल्याण काळे यांच्या प्रमुख उपस्थित हा पक्ष प्रवेश 16 झाला या कार्यक्रमात पाथरी येथील भाजपाचा शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस पद अधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला श्री. दिनकर शामराव बनसोड, योगेश पाथ्रीक, राजेंद्र जाधव, गफिर शेख सुभान, नानासाहेब भागवत जाधव, दगडू बंडू बनसोड, द्वारकाकिसन आबा बनसोड, ज्ञानेश्वर सर्जेराव बनसोड, ज्ञानेश्वर खंबाट, प्रमोद ढेपले, सोमीनाथ गवारे उमेश चव्हाण, काकासाहेब भागवत जाधव मनोज भास्कर बनसोड राजेंद्र ढेपले, मधुकर बनसोड, भागवत खंबट, सुनील बनसोड, कचरू बनसोड यांनी प्रवेश केला. या प्रसंगी फुलंब्री तालुका कांग्रेस कमिटीचे अध्यक्ष संदिपराव बोरसे, युवकचे जिल्हाध्यक्ष वरुण पाथ्रीकर, पुरुषोत्तम गाडेकर, रामेश्वर गाडेकर, मुकेश चव्हाण व अन्य पदधिकारी उपस्थित होते.

# 'महात्मा फुले जनआरोग्य'ची यशस्वी फलनिष्पत्ती

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष पंचायत समिती जळगाव जा अंतर्गत महिला स्वयं सहाय्यता समूहांची निर्मिती करण्यात येते.शासानाच्या विविध योजनांमधून महिलांना लाभ मिळावा व महिलाचा सर्वांगीण विकास व्हावा हा शासनाचा मुख्य उद्देश आहे.उमेद च्या प्रभावी अंमलबजावणीकरिता तालुका कक्षाने गावस्तरावर प्रेरिका, कृषी सखी,उपजीविका सखी, बँक सखी,आर्थिक समवेशन सखी, सीटीसी कन्व्हर्जन्स अशा समुदाय संसाधन व्यक्ती कार्यरत आहे. आज उमेदमुळे मोठ्या प्रमाणात महिलांच्या उपजीविका निर्माण होऊन त्यांच्या उत्पन्नात सातत्याने वाढ होत आहे. उमेद कक्षात कार्यरत असलेल्या शालिनी गणेश वानखडे वडशिंगी ता. जळगाव जा. CTC CONVERGENCE., समृध्दीग्रीन फार्मर प्रोड्युसर कंपनी अध्यक्ष. तसेच जळगाव जा. उमेद संघटना अध्यक्ष या पदावर कार्यरत आहेत. त्या उमेद चे सर्व कामे खूप चागल्या प्रकारे करतात अशातच त्यांचा अचानक 30. डिसेंबर 2023.ला ऍक्सिडेंट झाल्यामुळे हात फॅक्चर झाला. त्यानंतर त्यांना खामगाव येथे अग्रवाल हॉस्पिटल मध्ये ऍडमिट करण्यात आले ऍक्सरे काढून डॉक्टर नी ऑपरेशन करावं लागणार आहे. आणि खर्च 70,000 ते 80,000 पर्यंत येऊ शकतो असे सांगितले. शालिनी व गणेश वानखडे यांनी ऑपरेशन करण्याची संमती दिली.रात्री 11 वाजता ही बातमी विनोद शेगोकार तालुका व्यवस्थापक यांना कळताच त्यांनी तात्काळ मा.प्रकल्प संचालक राजेश इंगळे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बुलडाणा तसेच डॉ.सावके यांच्याशी संपर्क करून झालेल्या घटनेची माहिती दिली. शालिनी ताईचे महात्मा फुले जन आरोग्य योजनेमधून मोफत ऑपरेशन करता येते असे सांगितले.

राजेश इंगळे व डॉ.सावके सरांचा संदर्भ देऊन दुसऱ्या दिवशी शालिनी वानखडे यांना विठ्ठल हस्पिटल अकोला येथे रेफर करण्यात आले. तालुका कक्ष जळगाव जा मधून विनोद शेगोकार ,अमोल वैराळे ,सुबोध खोब्रागडे ,अनिल कफनकर यांनी शालिनी ताईला विठ्ठल हॉस्पिटल अकोला येथे ऍडमिट केले. आयुष्मान कार्ड वर महात्मा फुले जनआरोग्य योजनमधून मोफत यशस्वी ऑपरेशन झाले.उमेद मध्ये प्रामाणिकपणे महिला सक्षमीकरणाचा संकल्प हाती घेतलेल्या शालिनी वानखडे ताईला अभियाना मुळेच हा लाभ मिळाला.त्यामुळे त्या उमेद च्या खूप आभारी आहेत.

# शेतकऱ्यांच्या डोळ्यात कांदा आणणार पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** किरकोळ बाजारात कांद्याची दरवाढ होऊन कांदा दर्जानिहाय प्रति किलो २० ते ३४ रुपयांवर गेला आहे. नाशिक परिसरात महिनाभरापासून कांद्याचा विक्री दर १५०० ते १६०० रुपये प्रति क्विंटलवर स्थिर आहे. पूर्व हंगामी (अगाप) उन्हाळी कांदा बाजारात येऊ लागला आहे. लाल कांद्याच्या (खरीप) आणि उन्हाळी कांद्याच्या दरात फारसा फरक नाही. मे महिन्यात काढणी होणाऱ्या उन्हाळी कांद्याची साठवणूक होते.मार्चमध्ये काढणी होणाऱ्या उन्हाळी कांद्याची साठवणूक होत नाही. त्यामुळे बाजारात कांद्याची आवक वाढून दरात आणखी घट होण्याचा अंदाज आहे. कांद्याचा खरेदी दर महिनाभरापासून स्थिर असला तरीही बाजारातील किरकोळ कांदा विक्री दरात महिनाभरात सरासरी पाच रुपयांनी वाढ झाली आहे. राज्यात कांदा प्रति किलो २० ते २५ रुपये किलो, तर उत्तर भारतात कांदा २५ ते ३४ रुपयांवर गेला आहे. एकीकडे कांद्याच्या किरकोळ विक्री दरात वाढ होत असतानाच केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने २०२३-२४ या वर्षासाठी फलोत्पादनाचा पहिला अंदाज जाहीर केला. त्यानुसार यंदा देशात सुमारे ४७ लाख टनांनी कांदा उत्पादनात घट होऊन २५४.७३ लाख टन कांदा उत्पादन होण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत महाराष्ट्रात ३४.३१ लाख टन, कर्नाटकात ९.९५ लाख टन आणि आंध्र प्रदेशात ३.५४ लाख टन आणि राजस्थानात ३.१२ लाख टनांनी उत्पादनात घट होण्याचा अंदाज आहे. केंद्र सरकारच्या अधिसूचनेनुसार कांदा निर्यातबंदी ३१ मार्चपर्यंत आहे. पण, लोकसभा निवडणुका पाहता कांदा उत्पादनात सुमारे ४७ लाख टनांनी घट होण्याचा अंदाज आणि किरकोळ बाजारात कांदा विक्री दरात झालेली वाढ पाहता मार्चनंतरही कांद्यावरील निर्यातबंदी उठण्याची शक्यता दिसत नाही.

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी योजनेअंतर्गत सौर उर्जा कुंपणची वन विभागाकडून माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दि.डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना या योजनेअंतर्गत सौर कुंपण योजना महाराष्ट्र शासनाने राज्यातील शेतकऱ्यांसाठी सुरू केली आहे या योजनेमार्फत शेतकऱ्यांना सोलर कुंपण पुरवणे हे उद्दिष्ट आहे शेतकऱ्यांना महाडीबीटी मधून 75 टक्के अनुदानावर सौर कुंपण ही दिली जाणार आहे. त्याच्याबद्दल माहिती देण्यासाठी अजिंठा वन विभाग सावळदबारा यांच्यामार्फत ग्रामपंचायत येथे गावातील पंचवीस तीस शेतकऱ्यांना बोलवून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजने मार्फत शेतकऱ्यांना 19 हजार पाचशे रुपये संबंधित कंपनीच्या सौर ऊर्जा कंपनीला देण्यात यावे त्यानंतर 75 टक्के सबसिडी लाभार्थ्यांना देण्यात येईल 4500 ला शेतकऱ्यांना ते सौर कुंपण मिळेल असे कंपनीच्या एजन्टने सांगण्यात आले वन विभागाकडून सावळदबारा सर्कल मध्ये वन कर्मचाऱ्यांनी सुनील खर्डे वनरक्षक या कर्मचारी यांनी ज्या शेतकऱ्यांचे जंगली जनावरे यांच्या पासून नुकसान झाले आहे ज्यांनी ऑनलाईन अर्ज दाखल केले आहे असे शेतकऱ्यांचे सर्वे केले आहे.आणि जे वंचित आहेत त्या सर्वेनुसार जे बरेच योग्य शेतकरी आहेत पण देण्यात येणार आहे. पण काही शेतकऱ्यांनचे म्हणणे आहे की आम्हाला डावलून जवळीक लोकांचे नावे त्यात समाविष्ट करण्यात आले आहे असे इतर शेतकऱ्यांचा आरोप आहे व एकोणवीस हजार पाचशे रुपये दुष्काळाच्या वेळेस शेतकऱ्यांनी कुठून द्यावे व खाजगी दुकानावरती झटका मशीन सौर कुंपण दहा हजारापर्यंत मिळते तर या योजनेत शेतकऱ्यांनी 19500 का द्यावेत असाही प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे अनुदान शंभर टक्के देण्यात यावे अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

# वाढदिवसानिमित्ताने उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात महिला रुग्णांना साड्या, फळे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** चिरंजीव राम सुमित पंडित यांच्या सहाव्या वाढदिवसानिमित्ताने सिल्लोड येथील उप जिल्हा ग्रामीण रुग्णालयामध्ये फळे बिस्किटे व महिलांना साड्या वाटपाचा कार्यक्रम आज दिनांक १४ मार्च गुरुवार रोजी दुपारी ०१:०० वाजता सु-लक्ष्मी बहुद्देशीय सेवाभावी संस्था संभाजीनगर व माणुसकी रुग्ण सेवा समूहातर्फे समाजसेवक सुमित पंडित यांच्या वतीने घेण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले शेषराव उदार साहेब वरिष्ठ पोलीस निरीक्षक सिल्लोड शहर यांच्या हस्ते रुग्णालयात उपचारासाठी दाखल महिला रुग्णांना साड्या, फळे, बिस्किटांचे वाटप करण्यात आले.शेषराव उदार साहेब रुग्णालयातील रुग्णांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून समाधान व्यक्त करतांना ते म्हणाले की समाजात अनेक लोक हजारो रुपये बर्थडे पार्टी साठी खर्च करतात, डिजे,बॅनर,फटाके,हॉटेल मध्ये पार्टी ,चौका चौकात केक कापुन साजरे केल्या जातात, परंतु आज सुमित यांनी सांगितले की शासकिय रुग्णालयात गरजु रुग्णांना फळे व साड्या वाटप करायच्या आहेत तुम्ही या मी त्यांचे सामाजिक कार्य जाणून होतो व प्रत्यक्ष डोळ्यांनी देखील पाहिजे होते मी होकार दिला आणि पोहचलो, ह्या ठिकाणी जो आनंद मिळाला तो खरच अविस्मरणीय होता. खऱ्या गरजुंना ही माणुसकीची लोक मदत करतात, सुमित यांचा मुलगा राम ह्याचा सहावा वाढदिवस ह्याचे निमित्त साधून गरजुंना मदत, हे पाहून मी एकच सांगू इच्छितो की आपण सुमित



सारख्या मंडळीचा आदर्श घेऊन जर अशा पध्दतीने वाढदिवस साजरे केले तर खऱ्या गरजुंना मदत होईल.. सुमितच्या कार्यातून हेच साध्य होते जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले" तोची साधू ओळखावा देव तेथेची जानावा" अश्या वेगळ्या पद्धतीने वाढदिवसाचे निमित्त शोधून ग्रामीण रुग्णालयात राम सुमित पंडित याचा वाढदिवस साजरा झाला, या प्रसंगी शेषराव उदार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सिल्लोड शहर,मुक्ताराम गव्हाणे,समाजसेवक सुमित पंडित, रविंद्र सोनवणे,अतिक शेख,आजीनाथ पंडित बद्रिनाथ भालगडे, देविदास पंडित, शकुंतलाबाई शामराव पंडित,मीराबाई पंडित,पुजा पंडित,लक्ष्मी पंडित,राम पंडित व उप जिल्हा रुग्णालय येथील डॉक्टर व स्टाप सिल्लोड आदींनी मदतकार्य केले.

# ओम मोरेच्या कुटुंबीयांना सरकारने आर्थिक मदत करावी

## अ. भा. कुणबी मराठा महासंघाची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी स्व. ओम मोहन मोरे या तरुणाने आपल्या प्राणांचे बलिदान दिले असून सरकारने मोरे कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत जाहीर करून सकल मराठा समाजाच्या तीव्र भावना लक्षात घेऊन योग्य कार्यवाही करावी अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने नेवासा तहसीलदार यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे. सकल मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी सध्या मोठा लढा चालू असून अनेक तरुण केवळ आरक्षण नाही म्हणून शिक्षण व नोकरी गमावून बसत आहेत, मराठा कुटुंबातील सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या पिकांना हमी भाव नाही. शेतकरी व तरुण आज पूर्णपणे वैफल्यग्रस्त झालेले आहेत त्यामुळेच महाराष्ट्र भर सकल मराठा समाजाला सरसकट आरक्षण मिळाले पाहिजे या मागणीसाठी मोठा लढा उभा राहिला आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवार दि. ०९ मार्च २४ रोजी रात्री ९ वा. बजाजनगर वाळूज येथील स्व. ओम मोरे या अवघ्या वीस वर्षीय तरुणाने हताशपणे छत्रपती संभाजीनगर- अहिल्यानगर मार्गावरील प्रवरासंगम येथे स्व. काकासाहेब शिंदे सेतु वरून गोदावरी-प्रवरा नदीच्या संगमावर पाण्यात उडी घेऊन आपली जीवनयात्रा संपवली व मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी स्व. ओम मोरे याने आपल्या प्राणांचे बलिदान दिले.

यापूर्वी देखील २३ जुलै २०१८ रोजी याचं पुलावरून याच मागणीसाठी गंगापुर तालुक्यातील आगार कानडगाव येथील स्व. काकासाहेब शिंदे यांनी नदी पात्रात उडी घेऊन आत्महत्या केली होती त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र भर या मागणीसाठी वणवा पेटला ती धग आजपर्यंत कायम आहे. यापुढे सरकारने मराठा समाजाचा आता अंत बघू नये, मराठा समाजाच्या तीव्र भावना लक्षात घेऊन शासनाने त्वरित कार्यवाही सुरु करावी व स्व. ओम



मोरे यांच्या कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत मिळावी अशी मागणी निवेदनात केली आहे. सदरचे निवेदन तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांना देण्यात आले. निवेदन देतेवेळी कुणबी मराठा महासंघाचे उत्तर नगर जिल्हाध्यक्ष अनिल ताके,महिला आघाडीच्या तालुका अध्यक्षा सौ. निलिमाताई वाबळे, तालुकाध्यक्ष भारत बेल्हेकर,महिला आघाडीच्या शहराध्यक्षा सौ.जयश्रीताई शिंदे,तालुका उपाध्यक्ष बद्रीनाथ चिंधे, संदीप दरंदले, उपाध्यक्ष उज्वला गवळी,सौ.उषा संजय मारकळी,श्रीमती लीलाताई मारकळी,अशोक वाबळे, दिलीप शिंदे उपस्थित होते.



# चारशे कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे चारशे कोटी रुपयांच्या विविध विकासकामांची भूमिपूजन व लोकार्पण सोहळा केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार हरिभाऊ बागडे यांच्या विशेष उपस्थितीत गुरुवारी (ता.१४) पार पडला. तसेच विविध योजनेच्या लाभार्थींनी मंजुरी पत्र वाटप करण्यात आले. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, लोकसभाप्रमुख विजय औताडे, बाजार समितीच्या सभापती अनुराधा चव्हाण, संभाजीनगर बाजार समितीचे सभापती राधाकिसन पठाडे, तालुकाध्यक्ष सांडू जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीसह ऐश्वर्या गाडेकर, मंगला वाहेगावकर, दामू अण्णा नवपुते, पुष्पाताई काळेज सविता फुके, जितेंद्र जैस्वाल, राम बाबा शेळके, रामूकाका शेळके, इलियास शहा, बाळू तांदळे, राजेंद्र डकले, सूचित बोरसे, योगेश मिसाळ, अप्पासाहेब काकडे, सर्जेराव मेटे,नाथा काकडे, शिवाजी पाथ्रीकर, जितेंद्र जैस्वाल, तारु आप्पा मेटे, गणेश तांबे, नंदू कोलते, कलीम पटेल, विवेक चव्हाण यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# राज्य शासनाच्या वतीने विजय जगताप यांचा मुंबईत पुरस्काराने गौरव

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** राज्य शासनाच्या वतीने रिपब्लिकन पार्टी ऑफ़ इंडिया( आठवले )चे सामाजिक कार्यकर्ते विजय जगताप यांना त्यांच्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुंबई येथिल नरिमन पॉइंट जमशीदजी बाबा नाट्यग्रहात झालेल्या शासनाच्या पुरस्कार वितरण सोहळ्या प्रसंगी राज्याचे क्रीड़ा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते विजय व अरुणा जगताप यांनी पुरस्कार स्वीकाराला.

या प्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहल्याला आ. मंगल प्रभात लोढ़ा, आ. विजय अग्रवाल, माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे,न्याय विभागाचे सचिव सुमित भागे सह वरिष्ठ उपस्थित होते.

जगताप यांचे मागासवर्गीय समजातील विविध प्रश्न सोडवंयाचे कार्य सुरु आहे. अनेक शासकीय योजनाचा लाभ मिळून देण्यासाठी ते योगदान देत आहे. पुरस्कार प्राप्त बद्दल केंद्रीय सामजिक न्याय मंत्री ना. रामदास आठवले यांच्यासह विविध क्षेत्रतील मान्यवरनी अभिनन्दन केले.



# मिरजगावात गांजा विकणारी टोळी गजाआड

आधुनिक केसरी न्यूज

**मिरजगाव :** बस स्थानकाजवळ गांजा या अमली पदार्थाची विक्री करण्याच्या उद्देशाने रिक्षातून फिरत असलेल्या तीन व्यक्तींच्या टोळीला पोलिसांनी शिताफिने पकडून जेरबंद केले आहेत. असेल की ३जण रिक्षात बसून गांजा घेऊन शहरात येत आहेत अशी माहिती पोलिसांना समजली विवेकानंद वाखारे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा लावण्यात आला त्यावेळी मिरजगाव बस स्टँड जवळ उभ्या असलेल्या रिक्षामध्ये पाठीमागच्या सीटवर बसलेल्या व्यक्तीच्या पायाजवळ असलेल्या पिशवीत गांजा असल्याचे आढलून आले, अधिक चौकशी केली असता त्यात गांजा असल्याचे आधळून आले, त्यावरून अशोक (बन्सीलाल) पावरा, सुनील पावरा ,मंगेश पावरा, या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले त्यांच्याकडून प्रत्येकी ७ हजार रुपयांचा गांजा व मोबाईल असा सुमारे ८७ हजार ३९२ रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. ही कारवाई राकेश ओला पोलीस अधीक्षक अहमदनगर , प्रशांत खैरे अप्पर पोलीस अधीक्षक, विवेकानंद वाखारे उपविभागीय पोलीस अधिकारी कर्जत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पाटील, सुनील माळशिखरे, शंकर रोकडे, विकास चंदन, गणेश ठोंबरे, दीपक पवार, सुनील खैरे, गंगाधर आंग्रे, अशोक रक्ताटे यांनी केली आहे.



# गीता बाल विद्यामंदिर इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** (ताः खुलताबाद) येथील गीता बाल विद्यामंदिर इंग्लिश स्कूलच्या वतीने गुरुवार सायंकाळी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. यावेळी केजी विद्यार्थ्यांपासून सर्व वर्गांच्या मुला-मुलींनी गीत चाल सूर व नृत्य सादरीकरणातून प्रेक्षकांची मने जिंकली. स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन सरपंच आप्पाराव नलावडे यांच्या हस्ते झाले प्रमुख पाहुणे म्हणून आर आर फाउंडेशनचे अध्यक्ष विनोद पाटील जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई पी एस आय संजय खंडागळे संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय गंडे उपसरपंच कारभारी नलावडे पुंजाजी नलावडे भीमराव नलावडे प्रकाश नलावडे संदीप निकम अजिनाथ साळुंखे करण सिंग राजपूत संदीप गायकवाड जमादार संजय सपकाळ उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन होऊन दीप प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी विविध गीते लोकगीत एकांकिका नाटिका पोवाडे लावणी कोळीगीत काठ्यांचे खेळासह मराठी हिंदी गाण्यांवर योगासनांच्या तालासुरावर मनमोहक नृत्याचे प्रकार सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकली व वाहवा मिळवली. सूत्रसंचालन सहशिक्षक राहुल राजपूत यांनी करून आभार डी यु गंडे यांनी मांनले. कार्यक्रम कार्यक्रम यशस्वी करण्यास मुख्याध्यापिका श्रीमती गायकवाड व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# गॅरेजमध्ये आग; १७ दुचाकी जळून खाक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मार्केट यार्ड- गंगाधाम रस्त्यावर आई माता मंदिराजवळ एका गॅरेजमध्ये पहाटे आग लागली. आगीत १७ दुचाकी जळाल्या. आगीमागचे कारण समजू शकले नाही. गंगाधाम रस्त्यावर आई माता मंदिराजवळ गॅरेज आहे. पहाटे साडेतीनच्या सुमारास गॅरेजमध्ये आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली. त्यानंतर अग्निशमन दलाचे चार बंब घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचेपर्यंत गॅरेजमधील दुचाकींनी पेट घेतला होता. जवानांनी पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. आगीत १७ दुचाकी जळाल्या.

आग लागल्यानंतर परिसरात मोठ्या प्रमाणावर धूर निर्माण झाला होता. पहाटे झोपेत असलेल्या रहिवाशांना धुरामुळे जाग आली. आगीत कोणी जखमी झाले नाही. आगीमागचे कारण समजू शकले नाही, अशी माहिती अग्निशमन दलातील अधिकाऱ्यांनी दिली. गॅरेजमध्ये दुरुस्तीसाठी आलेल्या दुचाकी जळाल्या असून १७ दुचाकींना झळ पोहोचली आहे.

# आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या संघर्षाला यश

## राष्ट्रीय आरोग्य यंत्रणेच्या कंत्राटी कामगारांना शासकीय सेवेत सामावून घेणार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राष्ट्रीय आरोग्य यंत्रणेच्या कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी आमदार प्रतिभा धानोरकर यांनी अनेक दिवसांपासून केलेल्या प्रयत्नांना अखेर यश प्राप्त झाले असून बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्याला मान्यता देण्यात आली आहे.

राष्ट्रीय आरोग्य यंत्रणेतील कंत्राटी कामगार गेल्या अनेक वर्षांपासून कंत्राटी पदावर कार्यरत होते. त्यांनी शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी अनेक आंदोलने केली. यासंदर्भात त्यांनी आमदार प्रतिभा धानोरकर यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांना शासन दरबारी ठेवण्याची विनंती केली. या संदर्भात आमदार धानोरकर यांनी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांची भेट घेऊन त्यासोबतच माननीय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांची भेट घेऊन सदर विषय मार्गी लावावा या संदर्भात विनंती केली. विधानसभेत लक्षवेधी लावून सभागृहाचे लक्ष वेधले व या आरोग्य यंत्रणेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी कोरोना काळात शासनाला व नागरिकांना केलेल्या मदतीची माहिती करून दिली. शासनाने आमदार धानोरकर यांना शब्द दिला होता व लवकरच यावर निर्णय घेऊ असे सांगितले होते. वारंवार या विषयाचा पाठपुरावा आमदार प्रतिभा धानोरकर यांनी केल्याने त्याची फलश्रुती प्राप्त झाली असून बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राष्ट्रीय आरोग्य यंत्रणेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाने कायमस्वरूपी शासकीय सेवेत घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्या संदर्भात लवकरच शासन निर्णय निघणार असून हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. याबाबत राष्ट्रीय आरोग्य यंत्रणेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आमदार धानोरकर यांचे आभार मानले असून आम्ही सदैव तुमच्या पाठीशी राहू असे मत व्यक्त केले आहे...





# कायद्याचे राज्य आणण्यासाठी वकिलांनी काम केल्यास न्यायव्यस्थेचा दर्जा उंचावेल

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** न्याय मिळण्याच्या प्रक्रियेतील महत्वाचा घटक म्हणून 'वकीलांनी' कायद्याच्या नियमांचे राज्य आणण्यासाठी आपला व्यवसाय सांभाळून काम केले तर न्यायव्यस्थेचा दर्जा वेगळ्या उंचीवर जाईल असे मत संविधान विश्लेषक ॲडव्होकेट असीम सरोदे यांनी मांडले. चंद्रपूर जिल्हा बार असोसिएशनने जिल्हा न्यायालयात आयोजित संवाद कार्यक्रमात वकील असीम सरोदे बोलत होते. यावेळी चंद्रपूर जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ऍड गिरीश मारलीवर, उपाध्यक्ष ऍड मलक शाकीर, सह-सचिव स्वार्निश घोडेस्वार, ऍड दत्ता हजारे, ऍड वैशाली टोंगे, ऍड वर्षा जामदार, ऍड जयंत साळवे, ऍड श्रीधर झाडे, ऍड मनोज कवाडे, कार्यकारिणी सदस्य तसेच अनेक वकील उपस्थित होते.

आपण वकील म्हणून न्याय व समानतेचे रक्षक व पालानकर्ते आहोत या भावनेतून तीन वर्षांच्या आता वकिली केलेल्या व वार्षिक उत्पन्न 1 लाखापेक्षा कमी कमाई असेल त्या नवोदित वकिलांना दरमहा 5000 रुपये स्टायपेंड मिळावे यासाठी जनहित याचिका दाखल केल्याची माहिती ॲड. सरोदे यांनी दिली. तसेच महाराष्ट्रातील उच्च न्यायालयाचे कामकाज ऑनलाइन हायब्रीड पद्धतीने चालवावे या आम्ही दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या यशानंतर जिल्हा न्यायालयातील वकिल आता चंद्रपूर-गडचिरोली मध्ये बसून उच्च न्यायालयात केसेस चालवू शकतात असे सांगून असीम सरोदेंनी वकिलांना आवाहन केले की तंत्रज्ञानाचा वापर करून वकिली वाढवावी. वकिली व्यवसायातील ताणतणाव व आरोग्य समस्या वकिलांनी हलक्यात न घेता स्वतःच्या खाण्यापिण्याच्या सवयी बदलाव्यात, अती चहा-कॉफी पिणे त्वरित बंद करावे.

# बाळापूर उपनगरला बसेस थांबेनात

## कारवाई करा, अन्यथा आंदोलन : अंकुश बडगुजर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील नागपूर-सुरत महामार्गावरील असलेल्या बाळापुर उपनगर येथे राज्य परिवहन मंडळाच्या साधी- जलद अती जलद गाड्यांचा बस थांबा देण्यात आला आहे. मात्र सदर ठिकाणी बस थांबत नसल्याची प्रतिक्रिया बाळापूर येथील सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आली आहे. तसेच आपल्या धुळे आगारातील बस चालक व वाहकांना सूचना द्यावी व जळगाव, नाशिकसह इतर आगार प्रमुखांना पत्र देऊन बाळापुर उपनगराच नाव इबिक्स ईटीआयएम प्रणालीत समाविष्ट करण्याबाबत कळवावे अशा मागणीचे निवेदन ही राज्य परिवहन महामंडळ धुळे विभागाचे नियंत्रक यांना देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की धुळे लोकसभा मतदार संघातील धुळे शहरातील नागपूर-सुरत महामार्गावरील बाळापूर (उपनगर) येथे आपल्या परिवहन विभागाचा थांबा झाला आहे त्याठिकाणी रस्त्यांच्या दोन्ही बाजूला बस थांबविण्याचा फलक लावला आहे. तरीही या ठिकाणी कोणतेही बस थांबत नाहीत. व आपल्या ईबिक्स आयएम  मशिनला अजून बाळापूर नावाचे तिकीट मिळत नाही. त्याठिकाणी शाळकरी मुले व मुली तसेच ज्येष्ठ नागरिकांना व ग्रामस्थांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागते. त्यामुळे नागरिकांना नाहक प्रकारचा त्रास सहन करावा लागतो. तसेच दहावी व बारावीची परीक्षा सुरू आहे.तरी आपण लवकरात लवकर कार्यवाही करून बस थांबवण्याचे आदेश द्यावेत तसेच धुळे, नंदुरबार,शहादा, जळगाव, अमळनेर,नवापूर,नाशिक, बुलढाणा,अकोला,नागपूर, ठाणे, वापी, पालघर, पुणे, अमरावती, खामगाव, पनवेल सर्व विभागांना ईबिक्स आयएम प्रणालीत बाळापूर चे नाव समाविष्ट करण्यात यावे. व तशा सूचना व पत्र देण्यात यावे अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. सदर बाळापूर उपनगरातील ग्रामस्थांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी खासदार सुभाष भामरे यांच्या शिफारशीनुसार दुसऱ्यांदा धुळे परिवहन महामंडळाला पत्र दिले आहे. त्यामुळे खासदारांनी दिलेल्या पत्राला देखील धुळे परिवहन महामंडळ हिरवा कंदील दाखवेल अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. तसेच याबाबत कारवाई न झाल्यास किंवा मागणी विचारात न घेतल्यास तीव्र स्वरूपाच आंदोलन करण्यात येईल असा इशाराही निवेदनातून सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने देण्यात आला आहे.

याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते अंकुश बडगुजर, पत्रकार दिपक वाघ, तसेच विजय बडगुजर, व आदि ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.





# चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**लक्ष्मण मडके**

**शेवगाव :** वडुले बु प्राथमिक शाळेत इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अतिशय उल्हासपूर्ण वातावरणात आनंददायी पद्धतीने पार पडला. याप्रसंगी ग्रामपंचायत सरपंच श्रीम.अलकाताई सागडे,माजी सरपंच प्रदिप भाऊ काळे, जेष्ठ नेते तसेच मार्गदर्शक प्रभाकर डमाळ, ग्रामपंचायत सदस्य जावेद भाई शेख, मंगेश पाखरे, गणेश चोपडे, गणेश बुचकुल, अजय डमाळ, मोनिका ताई पाखरे, समिर शेख तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राम हरदास, उपाध्यक्ष अश्विनी ताई पाटील, सदस्य श्रीकांत लहासे, भगवान पाटील हे उपस्थित होते. नेहमीच शाळेला सहकार्य करणारे ग्रामपंचायत सदस्य जावेद भाई शेख यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना कंपास बॉक्स व पेन वाटप केले. तसेच माजी सरपंच श्री.प्रदिप भाऊ काळे यांनी देखील विद्यार्थ्यांना पेन वाटप केले.

भगवान पाटील यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना बिस्कीट पुड्यांचे वाटप केले.

यावेळी इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट म्हणून दिली. वर्गशिक्षिका श्रीम.उकिर्डे मॅडम यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना शाळेत कसे घडविले जाते?याविषयी छान माहिती दिली. राम हरदास यांनी आपल्या भाषणात शिक्षकांच्या कार्याविषयी गौरवपूर्ण उदगार काढले.

श्री.प्रभाकर तात्या डमाळ यांनी आपल्या भाषणात विद्यार्थी व शिक्षक यांच्या नात्याविषयी महत्वपूर्ण माहिती सांगितली . अध्यक्षीय भाषण करताना सरपंच श्रीमती.अलका ताई सागडे यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले व ग्रामपंचायतकडून शाळेला तसेच विद्यार्थ्यांना वेळोवेळी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोर्डे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीम.पाचारणे मॅडम यांनी केले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# वंचितांच्या विकासासाठी प्रधानमंत्री सूरज पोर्टल महत्त्वाचे

## हंसराज अहिर : जनकल्याण ॲपचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** समाजातील वंचित लोकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी गाव पातळीवरील शासकीय यंत्रणेसह डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर हा आर्थिक मोलाचा ठरला आहे. केंद्र शासनाने त्या दृष्टीने अधिक सुलभतेसाठी प्रधानमंत्री सामाजिक उत्थान रोजगार आधारित जनकल्याण ॲपचे लोकार्पण केले असून हे ॲप अधिक मोलाचे आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांनी केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बुधवारी 'प्रधानमंत्री सुरज' या राष्ट्रीय पोर्टलचे दूरदृष्यप्रणाली द्वारे लोकार्पण करण्यात आले. यानिमित्त वन अकादमी चंद्रपूर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंचावर सामाजिक न्याय व अधिकारी का मंत्रालय नवी दिल्लीचे अवर सचिव राकेश कुमार, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, चंद्रपूर महानगरपालिकेचे आयुक्त विपिन पालीवाल, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब देशमुख, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुरेश पेंदाम, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक मुकेश बारमासे उपस्थित होते. सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय अंतर्गत भारतातील प्रमुख शहरात दूरदृष्यप्रणाली द्वारे देशव्यापी शासकीय योजनांच्या लाभाचे वाटप करण्यात आले. यावेळी वन अकादमी येथे विविध लाभार्थ्यांना प्राथमिक स्वरूपात आयुष्यमान कार्डचे वाटप तसेच अपंग व्यक्तींना विवाह आर्थिक सहाय्य म्हणून प्राथमिक स्वरूपात नऊ जणांना २५ हजार रुपये प्रमाणे धनादेश वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अपर जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी तर आभार सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बाबासाहेब देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते.





# शिवसेना संपर्कप्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर यांना घरचा आहेर

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव (जामोद) :** शिवसेनेचे संभाव्य उमेदवार आणि जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर यांच्या संकुचित वागनुकीमुळे जळगाव (जामोद) येथील २२ फेब्रुवारी ची पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची सभा चर्चेचा विषय बनली होती. २३ फेब्रुवारी रोजी दैनिक सकाळने पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना उद्देशून "साहेब लोकसभेचा उमेदवार बदलवा" असे वृत्त प्रकाशित केले होते. त्याच दिवसापासून नरेंद्र खेडेकरांची उमेदवारी ही संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. शाहू परिवाराचे संदीपदादा शेळके यांची परिवर्तन यात्रा सुद्धा जोरात आहे.ते सुद्धा लोकसभेचे एक संभाव्य उमेदवार असून शिवसेना उबाठा गटाची उमेदवारी मिळण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. म्हणजेच प्रा.नरेंद्र खेडेकर यांचे ते उमेदवारीसाठी फार मोठे प्रतिस्पर्धी आहेत. अशातच जळगाव(जामोद) शिवसेना शहर प्रमुख रमेश ताडे आणि विधानसभा प्रमुख भीमराव पाटील हे नरुभाऊ खेडेकरांचे प्रतिस्पर्धी संदीपदादा शेळके यांच्या दावणीला गेल्याचे चित्र आहे.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे सभेपूर्वी महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांनी एकत्रित बैठक घेऊन उद्धव ठाकरेंच्या सभेला येण्याचे जाहीर आव्हान केले होते महाविकास आघाडीचे नेत्यांनी केलेले हे आव्हान नरेंद्र खेडेकर यांना रुचले नाही, त्यांचे सह संपर्कप्रमुख दत्ता पाटील, तालुकाप्रमुख गजानन वाघ यांनी ह्या सभेसाठी अथक परिश्रम घेतले होते. आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे सुद्धा त्यांना फार मोठे सहकार्य लाभले होते. त्यामुळे ही सभा फार यशस्वी झाली होती, परंतु प्रा नरेंद्र खेडेकर यांना उद्धव ठाकरे यांच्या समोर ही सभा महाविकास आघाडीची नसून एकट्या शिवसेनेचीच आहे हे भासवायचे होते. म्हणून त्यांनी सभेपूर्वी श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालयाच्या मैदानावर फारच लहान व्यासपीठ तयार केले होते. परंतु सभेच्या एक दिवस पूर्वी शिवसेनेचे संपर्क नेते माजी मंत्री अरविंद सावंत हे प्रत्यक्ष सभास्थळी पोहोचले आणि त्यांनी मोठा बदल करून प्रा नरेंद्र खेडेकरांप्रती नाराजी सुद्धा व्यक्त केली होती. हे सर्वश्रुत आहे.

ह्या सभेच्या दरम्यान प्रा.खेडेकरांची माध्यम प्रतिनिधींशी सुद्धा वागणूक ही संकुचित भावनेची दिसून आली. दिशा बचत गट फेडरेशनच्या सौ.जयश्रीताई शेळके ह्या सुद्धा शिवसेनेकडून उमेदवारीच्या प्रयत्नात आहेत. त्यांचे नेटवर्क जिल्ह्यामध्ये फार मोठे आहे. गेल्या दहा वर्षापासून जयश्रीताईंचा दांडगा जनसंपर्क आहे. विद्यमान खासदारांना धूळ चारणारे एकमेव नेतृत्व म्हणून सामान्य मतदार जयश्रीताई शेळके यांच्याकडे आशेने बघत आहेत. संदीप दादा शेळके सुद्धा शाहू परिवाराचे आहेत. अशातच शहर प्रमुख रमेश ताडे हे दिनांक १३ मार्च रोजी संदीप दादा शेळके यांना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या. ह्या शुभेच्छा वाढदिवसाच्या ? की उमेदवारीच्या? हा सुद्धा जनमानसामध्ये एक चर्चेचा विषय आहे.

# डॉ. पुलकितकुमारजी महाराज यांचे २० वर्षांनंतर संतांसह लोणार तपोभूमीत आगमन

आधुनिक केसरी न्यूज



**लोणार :** धर्मनगरी लोणार येथील सुपुत्र आचार्य श्री महाश्रमणजी यांचे सुशिष्य डॉ. पुलकितकुमारजी महाराज व त्यांचे सहकारी संत नचिकेता मुनिश्री आदित्यकुमारजी महाराज तळणी, मुनिश्री सुधाकरजी महाराज किन्ही, नरेंशमुनीजी महाराज यांचे जैन धर्मियांच्या पावन तपोभूमि लोणार मध्ये १३ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता आगमन झाले. यावेळी शेकडो जैन समाज बांधव व महिलांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. सर्व सतांना सोबत घेऊन स्वातंत्र्य मैदान येथून शोभायात्रा काढण्यात आली. दरम्यान तेरापंथ भवन जवळ चोरडिया परिवाराच्या वतीने संताचे स्वागत करण्यात आले. यानंतर प्रताप चौक, डोंगरवाल चौक, जैन मंदिर, जैन स्थानक मार्ग असे मार्गक्रमण करीत शोभायात्रेचा जैन धिरज भवन (गेलडा भवन) येथे समारोप झाला. गेलडा भवन येथे संत व बाहेर गावावरून आलेल्या पाहुण्यांचे स्वागत गीताने स्वागत करण्यात आला. यानंतर सर्व संतांनी प्रवचनाच्या माध्यमातून आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाला शहरासह, शेवली, देऊळगाव मही, मेहकर, दुसरबीड, जालना, औरंगाबाद, जळगाव, बिलारी, कर्नाटक आदी गावातील तेरापंथ जैन धर्मीय महिला उपस्थित पुरुष मोठ्या संख्येने होते. कार्यक्रमाचे संचालन तेरापंथ महिला मंडळ अध्यक्ष सौ. अनिता चोरडिया यांनी केले. तर सौ. सरला कोचर यांनी स्वागत गीत गावून कार्यक्रमाची शोभा वाढविली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहकर येथील जयचंद बाठिया, रामचंद्र कोचर, दीपक कोचर,अनिल चोरडिया, शांतीलाल जोगड, राजू दुगड, संतोष जोगड यांचेसह सुगनचंद कोचेटा,मनोज जोगड, निलेश छल्लाणी, विनोद जोगड, आशिष जोगड, अक्षय जोगड, जिनू चोरडिया, दर्शन जोगड, दिपक छल्लाणी युवकांनी परिश्रम घेतले. शोभायात्रा दरम्यान लोणार पोलीस स्टेशनचे ठाणेदार मेहेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवला होता.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# मसाजच्या नावावर तरुणींकडून देहव्यापार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** अंबाझरीतील टिळकनगरात असलेल्या ड्रीम फॅमिली स्पा-मसाज सेंटरमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून 'सेक्स रॅकेट' सुरु होते. या मसाज सेंटरमध्ये आंबटशौकीन ग्राहकांसाठी विवाहित महिला आणि महाविद्यालयीन तरुणींकडून देहव्यापार करवून घेण्यात येत होता. गुन्हे शाखेने या सलूनवर छापा घालून तीन तरुणींची सुटका केली. सलूनच्या दोन्ही मालकासह व्यवस्थापकावर गुन्हा दाखल करण्यात आला. निर्भय चंद्रमणी बलबिर (२०) याला पोलिसांनी अटक केली तर मालक यश किशोर कटरे (२२) आणि रवी शाहू (३५) हे दोघे फरार झाले आहेत. टिळकनगरातील ड्रीम फॅमिली स्पा-मसाज सेंटरमध्ये पुरुष ग्राहकांची अचानक गर्दी वाढायला लागली. विवाहित महिलांसह तरुणी मोठ्या प्रमाणात नागरिकांना दिसत होत्या. अंबाझरी पोलिसांचे या प्रकाराकडे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष असल्यामुळे कारवाई होत नव्हती. शेवटी गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक कविता ईसारकर यांनी बुधवारी रात्रीच्या सुमारास बनावट ग्राहक पाठवून शहानिशा केली. बनावट ग्राहकाने देहव्यापारासाठी तरुणीची मागणी केल्यानंतर सलूनचा व्यवस्थापक निर्भय बलबीर याने १८ ते २१ वर्ष वयोगटातील तीन तरुणींना हजर केले. त्यानंतर बनावट ग्राहकाने पोलिसांना सूचना दिली. पोलिसांनी सापळा रचून छापा घातला. तीनही तरुणींना ताब्यात घेतले. त्यापैकी एक महिला विवाहित असून तिला ३ वर्षांचा मुलगा आहे. पतीचा तुटपुंजा पगार असल्यामुळे ती स्पा-मसाज सेंटरमध्ये काम करीत होती. मात्र, मालक यश कटरे आणि रवी शाहू यांनी तिला ग्राहकांशी संबंध ठेवण्यास भाग पाडले.